म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा.मा.
दा. क्र. २८६८५

IRBK-0112975

IRBK-0112975

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

म. ग्रं. सं. ठाणें
त्रेषय
ग. नं.

केशव भिकाजी ढवळे : गिरगांव : मुंबई

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. क्र. 2९७५ ता. दि ....
वि. .... क्र. ....

IRBK-0112975

IRBK-0112975

हंसरीं नाट्यसुमनें

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

लेखक

चिं. आ. मुंडले, बी. ए., बी. टी.

शिक्षक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल, सदाशिव पेठ, पुणें

श्री. वि. स. खांडेकरांची प्रस्तावना

केशव भिकाजी ढवळे : श्रीसमर्थ - सदन,
गिरगांव, मुंबई ४

मूल्य बारा आणे

सर्व हक्क स्वाधीन

संवादाचा प्रयोग
करणाऱ्यांनीं प्रत्येक
संवादास एक रुपया
लेखक-दक्षणा
पाठविण्याचें करावें.

प्रथमावृत्ति : १९४०
पुनर्मुद्रण : १९४४, १९४९

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, १०३, शींव (पूर्व), मुंबई २२
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

प्रस्तावना

मराठींत बालवाङ्मय अत्यंत अल्प प्रमाणांत निर्माण होत आहे ही तक्रार आपण नेहमीं ऐकतोंच. पण बाल-वाङ्मयाइतकीच दुसरीही एक उणीव शाळेंतल्या शिक्षकांना नेहमीं जाणवत असते. ती म्हणजे विद्यार्थिवाङ्मय: दहा ते पंधरा सोळा वर्षांच्या दरम्यान ज्यांचें वय आहे अशा विद्यार्थिविद्यार्थिनींकरितां मराठींत वाङ्मय निर्माणच होत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें शाळेंतल्या सभासंमेलनांच्या वेळीं प्रेक्षकांच्या रंजनाकरितां जे कार्यक्रम होतात, त्यांत प्रौढ भूमिकांनीं युक्त अशा नाट्यप्रवेशांचाच समावेश चालकांना करावा लागतो. हे नाट्यप्रवेश मोठ्या नाटकांतले असल्यामुळें पूर्वापार संबंधाच्या अभावीं ते तुटक वाटतात. त्यांतलें गांभीर्यही कित्येकदां कंटाळवाणें होतें. त्या दृष्टीनें श्री. मुंडले ह्यांनीं लिहिलेल्या ह्या सुटसुटीत व विनोदप्रधान नाट्यसंवादांचें शाळांकडून स्वागत होईल ह्यांत शंका नाहीं.

विनोद हा विद्यार्थ्यांचा आवडता रस असतो हें ओळखून श्री. मुंडले ह्यांनीं तो आपल्या संवादांतून कुशलतेनें खेळविला आहे. 'मनोराज्यां' तली कल्पकता जेवढी आकर्षक आहे, तेवढीच 'पाहुण्यां'ची स्वारी परतून लावण्याकरितां घरमालकानें अंमलांत आणलेली युक्ति मौजेची आहे. 'भाषापरिषद' पाहातांना 'माणूस' मधील विविध भाषांतील गाण्याची गंमत आपण अनुभवीत आहों असा भास होतो; तर 'गांवठी साहेबा'चें इंग्रजी ऐकतांना अर्धांगीमधल्या दामूमास्तराच्या झटपट विद्यालयांत आपण बसलों आहों असें वाटूं लागतें. 'चार वेडे' ह्या नाट्यप्रवेशावरून वेड्यांच्या बाजारांतला अगदीं आधुनिक माल श्री. मुंडले ह्यांनीं विनोदबुद्धीनें पाहिला आहे अशी खात्री होते. 'A Test Case' व 'शंकर भोळे' ह्यांचे नुसते शेवट पाहिले तरी श्री. मुंडले ह्यांच्या विनोदी दृष्टीची वाचकांना कल्पना येईल.

श्री. मुंडले ह्यांनीं असे संवाद विपुल लिहावेत असें मी त्यांना सुचवितों. त्यांच्या संवादांना नाट्यपूर्ण प्रसंगांची जोड मिळाली, तर ते यशस्वी एकांकिका सुद्धां लिहूं शकतील.

वि. स. खांडेकर

कोल्हापूर, २८–५–४०

लेखकाचे दोन शब्द

हीं सुमनें मी माझ्या बालमित्रांना मोठ्या प्रेमानें अर्पण करतों. संमेलनादि समारंभांच्या वेळीं ते तीं प्रेक्षकांवर कौशल्यानें उधळून स्वतःबरोबर त्यांनाही आनंदित करतील अशी मला आशा आहे. कुशल बालनटांनीं आपली हौस मनसोक्त पुरवून घ्यावी, मनमुराद आनंद लुटावा व आपण कोणत्या सुमनानें प्रेक्षकांना कसें रंजविलें हें मला जरूर कळवावें अशी माझी त्यांना विनंती आहे. मला फार आनंद होईल. मी त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करीन. त्यांना संमेलनप्रसंगीं आतां संवादांची उणीव भासणार नाहीं असें वाटतें.

श्री. वि. स. खांडेकर ह्यांनीं जी मला स्फूर्तिप्रद प्रस्तावना आपला अमूल्य वेळ खर्चून दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. त्याचप्रमाणें हें पुस्तक इतक्या सुंदर स्वरूपांत प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. केशव भिकाजी ढवळे ह्यांचेही आभार मानणें जरूर आहे. ज्या माझ्या सुहृदांनीं मला अनेक प्रकारें बहुमोल साहाय्य केलें त्यांचे आभार मी व्यक्तिशः मानतोंच. त्यांचा नामनिर्देश होऊं नये अशी त्यांची इच्छा असल्यामुळें माझा नाइलाज झाला आहे.

रसिकांच्या अभिप्रायाची मी उत्सुकतेनें अपेक्षा करतों.

चिं. आ. मुंडले

म. ए. सो. हायस्कूल, सदाशिव पेठ,
पुणें, १३ नोव्हेंबर, १९४०

अनुक्रमणिका

मनोराज्य . . .	७
भाषापरिषद . . .	११
पाहुणे . . .	१७
खेळखंडोबा . . .	२५
गांवठी साहेब . . .	३५
इन्टरव्ह्यू . . .	३८
चार वेडे . . .	५०
A Test Case . . .	५७
काकांचा चहा . . .	६४
शंकर भोळे . . .	७४
बाळ गोपाळ . . .	८२

अनुक्रम ७५०
विभाग
क्रमांक
नों. दि.
ग्रंथालय

म नो रा ज्य

[मुलें अभ्यास करीत बसलीं आहेत.]

इंदु : (सर्वांत लहान) ए गडे मालुताई ! तुझ्या ह्या इतिहासांतल्या गव्हर्नर जनरलांचीं नांवं पाहातें आहें मी, त्यांत सारीं मेलीं इंग्रजांचींच नांवं, एक सुद्धां नाहीं आपल्या इकडला. एखादा तरी जोशी कुळकर्णी असायचा !

मालती : वेडीच आहेस अगदीं इंदे तूं, अग त्यांचंच राज्य होतं ना हें ? मग आपलींच माणसं नाहीं वाटतं पाठविणार ते ? कुणीहि असंच नसतं का केलं ?

इंदु : पण काय ग मालुताई ! जर आपल्या मराठ्यांनीं इंग्लंडवर स्वारी केली असती आणि आपलं राज्य त्यांच्यावर असतं, तर किती मौज झाली असती, नाहीं ग ? मग आज अगदीं उलटं झालं असतं सगळं, नाहीं गडे ?

मालती : कल्पना तर खरोखर फारच सुंदर आहे, इंदे ! नाहीं रे विनू ? खरोखर आपलं [illegible]र इंग्लंडवर आज दीडदोनशें वर्षं राज्य असतं तर....

विनू : तर आपला बग्या जो आज दोन वर्षं सारखा नापास होतो आहे, तो नसता का झाला एखादा बडा मामलतदार लंडनला ?

मधु : अन् लढाईच्या दिवसांत इथल्यापेक्षां आपल्या त्र्यंबकभटजींची तिथेंच नसती का त्या गोऱ्या हिंदु लोकांत चांगली चालली श्राद्धपक्षाची प्रॅक्टिस ?

नाना : त्या टेम्स् नदीच्या कांठीं, नाहीं ? तिथें आपल्या पेशव्यांनीं खात्रीनं बांधलं असतं एखादं सोट्या म्हसोबाचं देऊळ. नाहीं ?

मधु : मग रे काय ! दरवर्षी इकडून तिकडे कोट्यवधि रुपयांचे गठ्ठेच्या गठ्ठे गेले असते कद–धाबळ्या नि मुकटे–पितांबरांचे.

नाना : तर रे ! अन् मग काय विचारावी ती लंडनची शोभा ! शहरांत कसं छान् छान् बारक्या बारक्या बोळांचं जाळं पसरलं असतं नुसतं ! प्रत्येक नाक्यावर कांठोकांठ भरलेली भली मोठी काळी लोखंडी पेटी ; अन्, बरं का रे, राजरस्ता म्हणजे ' वेनस्डे स्क्वेअर ' पासून थेट ' सॅटरडे पॅलेस ' पर्यंत !

कमल : आणि मी सांगूं का ? मग एखादी म्हातारी सौ. डॉरोथीबाई टॉमसन् आपल्या मैत्रिणीला म्हणाली असती, ' अहो जिनेट्बाई ! काय बाई ही सुधारणा कीं सोंग हो ! परवां त्या मेयोईणबाईंची मार्गरेट आली होती आमच्या इथं ; काय तिचा तो पोषाख हो ! अंगांत धारवाडी खणाची चोळी, महेश्वरी लुगडं, हातांत गोठपाटल्या, केसांचं मागें तें मोठं चाक अन् कपाळावर रात्रीच्या वेळचं तें रेल्वेचं रेड–सिग्नल. '

विमल : आणि कमळे, त्यावर त्या जिनेट्बाई म्हणाल्या असत्या, बरं का, ' हे सारे ह्या फाजील सुधारणेचे थेर बरं डॉरोथीबाई ! आजकाल पाहातां ना ? मुली ७–८ वर्षांच्या झाल्या न झाल्या, तोंच त्यांचीं लग्नं झालींच १०–१२ वर्षांच्या मुलांशीं ; अहो, हिंदुस्थानांत करतात ना ? मग तें सारं चांगलंच म्हणायचं.

विनू : अन् तसंच एखादा वयोवृद्ध रा. रा. रॉबर्ट फिलिप्स आपल्या जुन्या स्नेह्याला म्हणायचा, ' काय हें पौर्वात्यांचं अंधानुकरण बोकाळलं आहे हो आपल्यांत ? सरदार स्नोडनसारखे मोठमोठे विद्वान, समाज-सुधारक म्हणवून घेणारे प्रवचनं आणि कीर्तनं करताहेत मंदिरांतून ; आणि सांगताहेत, कीं ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' आणि म्हणे चूलमूल या पलीकडे त्यांचं मुळीं क्षेत्रच नाहीं !

मधु : आणि विनू ! त्यावर तो स्नेही म्हणायचा, ' अहो रॉबर्टराव, चालायचंच हें असं. अहो मागच्या रविवारीं आम्हीं मोठी मौज पाहिली

बुवा! त्या लॉर्ड्सच्या मैदानावर मोठ्या थाटाचा भोजनसमारंभ चालला होता. तिथं आपले मेसफिल्ड, हार्डी, वेल्स, इब्सेन, शॉ, सारे बसले होते पंक्तींत कद-पितांबर नेसून, लाडवांवर हात मारीत सगळे बेटे उघडे बंब! प्रत्येकाच्या गळ्यांत त्या दोऱ्या आणि डोक्यावर साहरा वाळवंटा-तला ओॲसिस्!

इंदु : अन् काय ग मालुताई ? त्यांच्यांत एखादा ल हानसा जॉनी सुद्धां बसलेला असायचा, नाहीं ग, सोवळ्याची लंगोटी नेसून ?

मालती : (तिला शाबासकी देऊन) जरूर ; कां नाहीं ? पण अशा वेळीं तूं काय ग केलं असतंस इंग्लंडला जाऊन, इंदे ?

इंदु : मीं ? लंडनमध्यें फुगड्यांचा वर्ग काढला असता अन् तिथल्या मुलींना उखाणे अन् एकी का बेकी शिकवली असती.

विनू : शाबास! ए, पण माले, मुख्य गोष्ट राहिलीच कीं. आपलं त्यांच्यावर राज्य असतं, तर आणखी काय झालं असतं, माहीत आहे ?

मालती : काय रे ?

विनू : अग, चर्चिल, ॲटली, क्रिप्स हे सारे आले असते इकडे जास्त राजकीय हक्क मागायला आंगरखे पगड्या घालून, जोडे चटक् चटक् वाजवीत आणि मग आपण शनिवारवाड्यांत दरबार भरवला असता.

मालती : आणि मी सांगतें आपले मुख्य प्रधान त्यांना काय म्हणाले असते तें. त्यांनीं त्यांना असा उपदेश केला असता, "माझ्या आंग्ल बंधूंनो, अजून तुमच्यांत अनेक जातींची व धर्मांची विविधता नाहीं. चातुर्वर्ण्याचं महत्त्व अजूनही नीटसं नाहीं पटलं तुम्हांला. आतांशी कुठं अस्पृश्यतेला सुरुवात झाली आहे तुमच्या देशांत आणि नीट ध्यानांत ठेवा, कीं जोंपर्यंत तुमच्या स्त्रियांत स्वत्वाची—व्यक्तित्वाची खुळी जाणीव आहे तोंपर्यंत तुमच्या समाजांत कधींही सुधारणा होणार नाहीं."

विनू : "तुमची जुनी चिकित्सक बुद्धि सोडून द्या आणि आमच्या सनातन शास्त्रावर व रूढींवर अंधश्रद्धा ठेवा. म्हणजे मगच तुमची खरी

सर्वांगीण सुधारणा होईल व तुम्हीं जास्त राजकीय हक्कांना लायक व्हाल. व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही हीं खुळीं तत्त्वं विसरण्याचं शिक्षण द्या तुमच्या तरुणांना."

मालती : "अंधश्रद्धेचा प्रसार करण्याचे कामीं तुम्हांला मदत करण्याकरतां आम्ही मोठ्या आनंदानं तिकडे वीस पंचवीस बुवांचं एक पथक पाठवून देऊं. आपण आलांत, विचारविनिमय झाला, फार संतोष झाला आम्हांला. आतां परत गेल्यावर आपल्या तरुणांना असल्या तऱ्हेचं शिक्षण द्या."

इंदु : पण काय ग मालुताई, उच्च शिक्षण घ्यायला तिकडलीं तीं इंग्लिश मुलं इकडे येणार नाहींत ग मग ?

मालती : तर ग ! येणारच तीं ! आणि मग बाई, आपल्या आईबापांना न कळवितां इथंच तुझ्यासारख्या मुलींशीं गुप्चुप् लग्न करून परत जातांना त्यांना घेऊन जाणार तीं तिकडे !

इंदु : अगोबाई ! नको ग बाई मग आमचं त्यांच्यावर राज्य. आपण त्यांना स्वराज्य देऊन टाकावं झालं. (सर्वजण हसतात.)

२७०८ अनुक्रम विभाग नं. २१

भाषापरिषद

अध्यक्ष : Gentlemen, we have assembled here to exchange amongst us the beauties in the literatures of different languages. प्रत्येक भाषेच्या वाङ्मयांत सुंदर काव्य ओतप्रोत भरलेलें असतें. " विपुला काव्यसंपत्तिर्वर्तते सर्वासु भाषासु । अतः अस्माभिः कूपमंडूकवृत्तिं त्यक्त्वा इस भारत भूमीमें जितनी जबानें बोली जाती है उनमें भरे हुवे काव्यानंदका आस्वाद जरूर लेना ही चाहिये । आ परिषद मा बद्धाए आपनो साहित्यभांडार खोलीने बताववानी घणी सुंदर संधि मळशे. इदे परिषदल्लि नाऊ कन्नड भाषेय गुरतन्नुकूड माडिसी कोळ्ळोण. अदरल्लियू काव्यवू शिगुत्तदे. So I call upon Prof. Smith to reveal to us a few brilliant gems from his English treasures.

Prof. Smith : Gentlemen, the treasure of English Literature is undoubtedly the richest in the world. Those who have not had the good luck to get even a glimpse into it are unfortunate indeed. Let me, therefore, show you a few of its most precious gems. Our great William Shakespeare says in his famous Paradise Lost, " Work while you work and play while you play; that is the way to be happy I say." What a wonderful idea ! Here's another. The mighty John Milton's great hero Bernard Shaw says in Macbeth, " To be or not to be, that is the great question. " How many of you can answer that question? And now take this twentieth century Kohinoor. Mark carefully how the world's eternal problem has been so magnificently concentrated by Charles Dickens in his English Oxford Dictionary. Says his Mary Anne—(Sings) "He used to

come and call me little Mary Anne. And I used to think that he was my young man. But mother caught his eye and they got married on the Clyde. And now I have to call him F a-a-a-ther." Isn't it a most romantic tragedy? Observe the metaphysical speculation of psychological anthrapology. I must, however, stop here, and request you to take at least a dip or two into this unfathomable ocean of our English Literature.

अध्यक्ष : आतां रा. रा. परांजपे यांस मी मराठींतील कांहीं काव्यसुमनें आपणांवर उधळण्याची विनंति करतों.

रा० परांजपे : अध्यक्षमहाराज व बंधूंनो, आम्हांला जरी इंग्रजी फारसें येत नसलें, तरी माझे मित्र श्री. स्मिथ यांच्या काव्यामृताचा आम्हीं भरपूर आस्वाद घेतला असें मी त्यांना आश्वासन देतों. कारण त्यांची बोलण्याची धाटणी व विषयाची मांडणीच मोठी परिणामकारक होती. असो, मराठी भाषा ही आपणां सर्वांना सुपरिचित असल्यामुळें त्यांतील रसास्वाद आपण सहज घेऊं शकाल अशी आशा आहे. आतां मी मराठी काव्योद्यानांतील दोन चारच सुमनें आपल्यावर उधळतों. ऐका. एके ठिकाणीं बालकवि म्हणतात, " चिमकुल्या छकुल्या न रडे उगा । धर करीं चिमणी अथवा फुगा ॥ " अहाहा ! काय रम्य कल्पना पण ! चिमणी आणि फुगा यांची सुंदर सांगड घालून व्यवहारांतला अगदीं सामान्य अनुभव पहा कसा कौशल्यानें फुगविला आहे. त्याचप्रमाणें उद्यानांतील तळ्याच्या कांठीं तो गोजिरवाणा राजहंस निजलेला पाहून नलराजा म्हणतो, " हे कोण बोललें बोला, राजहंस माझा निजला. " अगदीं कमाल केली आहे मोरोपंतांनीं ह्या काव्यांत. तसेंच 'वाक्यपृथक्करण' या सुप्रसिद्ध संगीत सामाजिक नाटकांतील नायक आपल्या प्रियेच्या दासीला पहा कसा मोठा मार्मिक अन् खुबीदार प्रश्न काव्यांत विचारतो. तो म्हणतो, " सारिके ग, चंद्रिकेचें कुशल आहे ना ? असेल तर तसं सांग, नसेल तर तसं सांग ! पण कां ऽ ही–ही–ही–सां ऽ ऽ ऽ ग ॥ "

साध्याहि विषयांत एवढा मोठा आशय अभिजात अशाच कवींना आढळतो. आणखी एक उधळूं सुमन? (अध्यक्ष घंटा वाजवतात.) वेळेच्या अभावीं मी येथेंच आपलें भाषण पुरें करतों. आपण शितावरून साखरभाताची परीक्षा करालच. मी दिलेल्या उदाहरणांवरून आमची मराठी भाषा नानातऱ्हांच्या पक्वान्नांनीं कशी समृद्ध आहे, याची आपणांस पूर्ण कल्पना येईल, अशी आशा करून मी आपलें भाषण पुरें करतों.

अध्यक्ष : अथ प्रार्थयन्ते मया वेदशास्त्रसंपन्नाः महामहोपाध्यायाः दिनकरशास्त्रिणः । श्रूयतेहि अत्रभवतः गीर्वाणकाव्याकाशे बहूनि भास्वन्ति चेतोहराणि नक्षत्रग्रहतारकाणि विराजन्ते । तेषां दिग्दर्शनं कर्तुमर्हति अत्रभवान् ॥

दिनकरशास्त्री : अयि अध्यक्षमहाभागाः बांधवाश्च । स्थाने खलु गीर्वाणवाणी देववाणी इति पदवीं गता यतः सा ईश्वरनिर्मिता एव । न सा मानवी । यानि नक्षत्रग्रहतारकाणि अस्यां प्रकाशन्ते तानि दिव्यान्येव । अस्थाने खलु युष्माकं प्रयत्नः संस्कृतकाव्योदधिगाहने । ईषत् ईषत लीनतया केवलं रसास्वाद एव ग्रहीतव्यः इति मे विज्ञप्तिः । श्रुणुत— कविकुलशेखरः कालिदासः पंचतंत्रकाव्ये वदति ‘रामो हरिः करी भुर्भुर् भानुः कर्ता च चंद्रमाः । तस्थिवान् भगवानात्मा दर्शते पुंसि नायकाः ।’ तथा च एकदा पार्थः श्रीकृष्णं पप्रच्छ, ‘भगवन् शक्लृ पच् मुच् रिच् वच् विच् सिच् प्रच्छिल्त्यज् निजिर्भजः ?।’ तदा अतीव प्रमुदितो भगवान् श्रीकृष्णः सस्मितं उवाच ‘बिडालांस्ताडयति पुरुषः एरण्डोऽपि द्रुमायते । तथाहि शीघ्रकोपिनि दुर्वासऋषौ अतिथिन्यायेन उपस्थिते श्रूयन्तां द्रौपद्या वचन धर्मराजंप्रति—

किं सा चक्लिः किमुसच्चिवडा किं भजिः किं चहासौ । तदा भीमस्तु साटोपमाह ‘दीयतां तमाखुपत्रमेव यतः क्वचित् हुक्का क्वचित् थुक्का, क्वचिन्नासाग्रगामिनी । तमाखुः त्रिपथगाचैव इति ।’ अलमति विस्तरेण, यदि भवद्भिः अत्र काव्यं न दृश्यते न कदापि कुत्रापि खलु काव्यं वर्तते ।

अध्यक्ष : अब लखनौके स्वामी विद्यालंकार भवानीशंकर आपको हिंदी भाषाके चमकीले और नये नये जवाहरात बतायेंगे। जिनको देखकर मुझे यकीन है कि आप साहेबाने मजलीस जरुर खुशतवियत हो जायँगे।

स्वामी विद्यालंकार : जवाहरात बताने के पहिले मुझे एक बात कहनी है। वह यह कि हिंदी भाषा ही सबसे आसान है यह कहा जाता है। और इस लिये वह राष्ट्रभाषा होनेकी लियाकत रखती है। मेरी दृष्टीमें चित्रपट देखनेके वास्ते उसका ज्यादा फायदा होता है। अब मैं जवाहरात बतानेकी दृष्टीसे दो एकही नमूने आपके सामने पेश करता हूँ। एक स्थानपर भगवद्भक्त कबीर अपने सुंदर दोहे में कहते हैं, "बखत पडे बाका तो गधेको कहना काका।" इस लिये मेरी यह प्रार्थना है कि सभापति काकासाहेब अपने नाममें बदल कर दे। कवि किसी खास मौकेपरही काव्यकी रचना कर देता है। एक बडा मशहूर कवि जिसका नाम मुझे याद नहीं एक समय वीमार था। उसके यहाँ डाक्तर आकर जब उसे इंजक्शन देने लगा, तब उसके मुँहसे यों वचन निकला, 'कन्हैया, ऐसी ना मारो पिचकारी।' यह काव्य सुनते ही डाक्तरसाहब मारे खुशीके बेहोश होकर धडामसे गिर पडे। तुलसी रामायणमें रामकी ओर जानेवाली प्रेमविव्हल शूर्पणखा इस तरह गाती है, 'पिया विन नहीं आवत चैन।' इन उदाहरणोंसे हिंदीकी महत्ता आपको मालूम हुई होगी। जादा कहकर मैं आपका समय जाया करना नहीं चाहता हूँ।

अध्यक्ष : गुर्जरसाक्षर श्रीहसमुखलाल मणिलाल मेहताने पोतानुं भाषण करवानी हुं विनंती करुं छुं.

श्री. मेहता : हिंदुस्ताननी कोईपण भाषा करतां गुजराती साहित्यनुं स्थान उतरतुं नथी. संगीतना सनातन नियमोने जाणनार पाश्चात्य विद्वानोनुं कहेवुं छे के जेम युरोपमां इटालियन् भाषा कर्णप्रिय अने संगीतमय छे तेम हिंदुस्तानमां गुजराती भाषा छे. (डावा हात जोरजोरानें हालवून) एतो तमे नामदार मुनशीजीनां भाषण सांभळ्या

होय तो तद्दन खात्री थई जाय. उत्तम कविओनो फाल गुज़रात जेटलो कोई प्रजाए भाग्येज आप्यो हशे. श्री. धूमकेतू जेवा भक्त कविनुं रचेलुं काव्य 'वैष्णव जनतो तेने कहिये। जे पीड पराइ जाणेरे। परदुःखे उपकार करे। तोय मन अभिमान न आणेरे'। ए आजे स्वामी श्रद्धानंदथी शरु करी गमे ते सामान्य विद्यार्थीने मोढे चढी गयुं छे; स्त्रीओ माटे रास लखवा माटे पंकायेला कवि श्री. रमणलाल वसंतलाल देसाईनो भावभीनो रास "बोलमा बोलमा बोलमारे, राधाकृष्ण विना बीजु बोलमा रे" गुजरातमां घेर घेर गवाय छे. हास्यरसमां गुजरात अद्वितीय छे. झवेरचंद मेघाणी, अर्देशर फरामजी खबरदार अने कवि नानालाल दलपतरामनो मार्मिक तेमज उत्कट हास्यरस गमे तेवी रोती सूरतने पण पेट पकडीने हसावी शके छे. आउपरथी गुजराती साहित्यनी कल्पना आपने सहज आवी गई हशे एम मानी विरमीश.

अध्यक्ष : श्रीमान् गट्टूमल शेटजी इन् बारेमे दो शब्द केवेला.

श्री. गट्टूमल : सभापतीजी ओर भाईसाब, आपां किसवास्ते अठे मेला हुआ इनरी समजपीण हमोने पडती नहीं. हमो साहित्य वगेरे जानवारी तसदी लेवो नहीं. हमोरी भाषा कोइथी पण शिखीजे नहीं. म्हाको नामो समजवाने इनकमटोक्सवालने घनो माथो चलावनो पडे. आपां तो वाणीया हो ओर उद्यम ने बेपार म्हाको जीवन हे. विद्वान् करता धनवान् ने जादा समजो हो. म्हाको उद्देश तो दो चार घर बंदावारो रवेहे. नही के एखादी चोपडी लखवारो. काटकसरसु ओर सादाइसु किस्तरे रेवनो ओ म्हाकासु आप शीखशनो. हमारी बेपाररे वास्ते कठे बी जावनरी तयारी हुवा करे. भारत के बारे बी हमो गया हो. बिलायत, अमरीका और आफरिकामे पीण हमोरा भाई बेपार करे हे. आपने मालम होवेला के हमो सनातन धर्मरा अभिमानी हो. 'देस सोडनो पीण वीस नहि सोडनो' एरी वडेरारी शिखोमन हे. आपने कई कऊं! आज कल तो ए शिखीयोरा ओर सुधारीयोरा छोरा माने नहीं. ए तो धरम बीरम सब भूलने बटर गया लागे हे. म्हाने भाषण वीषण कई कारतां आवे

नहीं. आपांने तो गिन्हाइक अच्छी तरहसु पटावतो आवे. सभापतिरी राह देख रया हो के घंटी बजावे (घंटी बजे) बोलो सनातन धर्म की जय।

अध्यक्ष: इन्नुमेले श्री. गदिगेप्पा मुद्दाळप्पा साधनहळ्ळी इवर कन्नड भाषेय परिचयवन्नु माडि कोडालेंदु बेडिकोळ्ळुत्तेने.

श्री. गदिगेप्पा: अध्यक्स महासयरे मत्तु भंदुगळे, नम्मल्ली रन्नयंब महाखवि आदनु. अवनु तन्न चन्न केसव महाखाव्यदल्ली, "एळु मुद्दिन खणिये एळु सदगुण मणिये, येळु बेळगाइतइ." यंदु हेळिद्धाने. अहा यान खवि मत्त यान खविता. नन ग ई उमेधा ऐ तल्ला कीं ई हिंदुस्थानदल्ली नम्म कन्नड भासेयष्टु शंवि यावदु इल्ला. अदरंते नम्मल्ली हेसराद पंपनाटककारनु तन्न 'इंदिरे नाटक' दल्ली वन्दु वचन हेळ्यान "करद हेण्णु कोटर अळ्याग मलरोग भंत अंत." एनु सार्थ उफमा. भेष! ईग याळ्या भाळ आगैत्ति. इन्नोंदु उदाहरण हेळी नन्न भाषणे मुगस्तेनि. पुरंदरदास न्यंब परसिद्ध नाटककारनु "सिद्ध" यंब नाटक बरदा अदरल्ली सिद्धनु तन्न हेणतिन्न तिरगाडिलिक्के करकोंडु होगिद्दा. आगीन याळेय वर्णना हींग माड्यान "मुगिल माग्याग राग रतिया नंज एरित्त आग छंजि यागित्त."

अध्यक्ष: Gentlemen, we have indeed had a magnificent poetical banquet. आणि ह्या काव्यभोजन समारंभांत आपण सर्वांनीं नव्यानव्या व उत्तमभोत्तम अशा पक्वान्नांचा मनमुराद आस्वाद घेतला आहे. तेषु संस्कृत काव्यश्रवणं तु ईश्वरप्रसाद एव इति दृढश्रद्धया भुक्ता: अस्माभि: । हमारी यह परिषद यशस्वी करनेके लिये आपने जो तकलीफ उठाई उसवास्ते मैं आपको बहोत हार्दिक धन्यवाद देता हूँ। आवी जातना स्नेहसंमेलनोने लीधे आपणामां मित्रभाव उत्पन्न थाय छे. म्हारी समज हे की इन तरहसु वरसो परिसद भरवाथी घनोज फायदो होवे हे। इन्नोम्मे नानु निम्मेल्लर आभार मन्नीसी इ परिषद्न्नु मुगीतेंदु जाहीर माडुत्तेने.

(सभा विसर्जन होते.)

श्री. गदिगेप्पा : तन्न हेणतिन्न तिरगाडलिक्के करकोंडु होगिद्दा.

[पृष्ठ १६

[बाबू अण्णाच्या मनगटाला चावतो.]

[पृष्ठ २०

पाहुणं

(अप्पा व अण्णा यांची खोली. चिंताग्रस्त अप्पा असला तरी विचार करीत खोलींत येरझाऱ्या घालीत आहे. अण्णा प्रवेश करतो व रागानें टेबलावर टोपी आपटतो.)

अण्णा : बेअकली लेकाचा !

अप्पा : काय झालं अण्णा ?

अण्णा : असा राग येतो, कीं कधीं तोंड पाहूं नये अशांचं. अरे, म्हणे त्याच्या मोठ्या मुलाला सहावीचं गणित आणि इंग्लिश शिकवा आणि या कामगिरीबद्दल आम्हांला महिना अखेर एकदम सबंध सोळा अठ्ठे अठ्ठाविसासे आणे मिळणार. आहे कीं नाहीं अक्कल ?

अप्पा : मग तूं 'नाहीं' म्हणून सांगितलंस ना ?

अण्णा : नाहीं म्हणून कसं चालेल अप्पा ? अडला नारायण मी; नकोत त्याचे पाय धरायला ? ताईच्या हुंड्याचे हप्ते भरतां भरतां तूं किती जेरीला आला आहेस तें मला दिसत नाहीं का ? त्यांतून माझ्या दुसऱ्या टर्मची फी कुठून देणार तूं ? आतां मला हातपाय हलवलेच पाहिजेत; आणि अप्पा, मी तर उद्यांपासून एकच वेळ जेवायचं ठरवलं आहे. म्हणजे सिंगल डबा पुरेल दोघांत.

अप्पा : वेड लागलं आहे का तुला ? मी मिळवता आहें तोंपर्यंत तुला कशाला पैशाची काळजी ? मी सगळी कांहीं बरोबर व्यवस्था करतों. तूं आपला शांत मनानें नुसता अभ्यास कर.

अण्णा : नाहीं; अप्पा, या वेळेस मी नाहीं ऐकायचा तुझं. माझा अगदीं निश्चय ठरला आहे. अन् एक वेळ जेवून मरतो कीं काय मनुष्य !

उलट त्या डब्यांतलं तें अन्न थोडंसं कमी पोटांत गेलं तर प्रकृति चांगलीच राहील. छे, तें कांहीं नाहीं; काटकसर केलीच पाहिजे आपण.

(आंतून आवाज) अप्पासाहेब कुलकर्णी इथंच राहातात का?

अप्पा : होय इथंच. कोण आहे? या आंत.

सोनटक्के : (प्रवेश करून नमस्कार करीत) अप्पासाहेब कुलकर्णी आपणच?

अप्पा : (उलट नमस्कार करून) होय मीच, बसा. आपण कोण?

सोनटक्के : माझं नांव त्र्यंबक मार्तंड सोनटक्के. मी सोलापूरहून आलों. सोलापूरचे नारायणराव भुस्कुटे आपले स्नेही आहेत ना?

अप्पा : सोलापूरचे नारायणराव भुस्कुटे कोण बुवा?

सोनटक्के : अहो, तो नारायण केशव भुस्कुटे. आपण दोघं रमण-बागेच्या शाळेंत बरोबर होतां; अन् एकदा मारामारींत त्यानें आपले दांत पाडल्याबद्दल त्या जोशी सरांनीं ज्याला बेदम झोडपला, तो—

अप्पा : हं–हं–हं आलं लक्षांत – तो गुंड नाऱ्या भुस्कुट्या होय? माझ्याबरोबर मराठी दुसरींत होता तो. फार वर्षं झालीं बघा त्याला. काय करतो हल्लीं तो?

सोनटक्के : नोकरी कुठें मिळेना, म्हणून शिकवण्या धरल्या आहेत त्यानें दोन तीन.

अप्पा : अस्सं? आपण त्याचे स्नेही वाटतं?

सोनटक्के : छे, छे, हो; त्याचं आमचं नातं आहे कीं चांगलं जवळचं. म्हणजे बघा, आमच्या वहिनींची जी मामी ती त्याच्या मामीची वहिनी लागते. लक्षांत ठेवायला अगदीं सोपं आहे नाहीं?

अण्णा : तें खरं, पण आपलं काम नाहीं समजलं अजून आम्हांला.

सोनटक्के : काम होय? विशेष असं कांहीं नाहीं. त्याचं असं झालं बघा, मी नुकताच टाइफॉइडमधून उठलों. मरतां मरतां वांचलों म्हणाना; तेव्हां आमचे डॉक्टर, ते फडके, प्रसिद्ध एम्. डी., ते म्हणाले,

' महिना दोन महिने कुठें तरी जाऊन हवापालट करून या ! ' विचार पडला, कुठं जावं ? तेव्हां आपल्या ह्या नारबानं सुचवलं, कीं ' जा पुण्याला. हवा फार छान आहे तिथली. अन् राहायचीही पंचाईत नाहीं. अप्पासाहेब आपलेच आहेत. फार आनंद होईल त्यांना. ' मीही पुणं पाहिलं नव्हतंच अन् नारबानें आग्रह केला भयंकर ; तेव्हां आलों झालं. म्हटलं, या निमित्तानें आपला चांगलाच परिचयही होईल. हो ! आल्या गेल्याशिवाय का कुठें ओळखी होत असतात ? पण 'काय हो, नारबाचं पत्र नाहीं मिळालं वाटतं आपणांला ?

अण्णा : नाहीं बुवा. अहो, पण आम्ही दोघं कांहीं जरुरीच्या कामासाठीं दुपारच्या एकच्या गाडीनं कलकत्त्याला जाणार आहोंत.

सोनटक्के : असं ? म्हणजे आपण परत येईपर्यंत मला इथें राहावं लागणार म्हणतां ? राहूं, मग काय करायचं ?

(आंतून आवाज) अहो सोनटक्के, आम्ही बाहेर उभें आहोंत म्हटलं. विसरलांत वाटतं ?

सोनटक्के : अरे खरंच कीं, अजिबात विसरून गेलों बोलण्याच्या नादांत. या हो रामभाऊ. अप्पासाहेब आहेत घरांत. या कीं.

(रामभाऊ भसाळे व छोटा बाबू सामानासह प्रवेश करतात.)

सोनटक्के : या. हे आमचे अप्पासाहेब कुळकर्णी आणि हे सोलापूरचे नामांकित सराफ रामभाऊ भसाळे. मुद्दाम डॉ. घारपुऱ्यांना प्रकृति दाखवून कानाचं ऑपरेशन् करवून घेण्याकरतां येत होते पुण्याला. ' गेस्ट हाउस ' मध्यें उतरणार होते. म्हटलं, कशाला उतरतां तिकडं ? चला माझ्याबरोबर अप्पासाहेबांच्या घरीं. ते आपलेच आहेत. कां अप्पासाहेब, होय कीं नाहीं ?

अण्णा : अहो, पण हें जमेलसं दिसत नाहीं. आम्ही आज जे कलकत्त्याला जाणार आहोंत, ते तीन चार महिन्यांनीं परत येणार.

सोनटक्के : अहो त्यांत काय आहे एवढं न जमण्यासारखं ? तुमच्या कुलुपाला दोन किल्ल्या आहेत ना ? एक आमच्यापाशीं ठेवा, अन्

एक घेऊन जा कीं तुम्ही. दोन नसतील तर आम्ही परत गेल्यावर तुम्हांला तुमची किल्ली पोस्टानें पाठवून देऊं. मग तर झालं ?

(ह्या वेळपर्यंत बाबू टेबलावर चढून तेथील कागद पुस्तकें वगैरे उचकटतो व घड्याळाचे कांटे फिरवून अलार्म वाजवितो.)

अप्पा : अरे बाळ, काय करतोस रे हें ! ठेव कीं तें. मोडेल रे !

(बाबू त्यांना वेडावतो.)

अण्णा : अहो मिस्टर, त्या मुलाला सांगा कीं जरा कांहीं. मोडेल कीं तें.

सोनटक्के : काय करावं ह्या मुलाला. मोठा व्रात्य आहे हो अगदीं ! अगदीं ऐकत नाहीं सांगितलेलं ! माझ्या मागोमाग स्टेशनवर आला आणि मी येणार तुझ्याबरोबर पुण्याला म्हणून हट्ट धरून बसला ! चल म्हटलं बाबा, काय करायचं ! बाब्या, घड्याळ ठेव बाळ तिथं ; आणि उतर पाहूं खालीं !

बाबू : नाहीं ठेवत जा ! तूं कोण सांगणार मला ?

सोनटक्के : पाहिलंत, कसा हट्टी आहे तो ? ऐकत नाहीं मुळीं !

अण्णा : पाहातों कसा ऐकत नाहीं तो ! (बाबूला) ठेवतो कीं नाहीं रे तें घड्याळ जागेवर ? (बाबू 'नाहीं' म्हणतो. अण्णा तें त्याच्या हातांतून हिसकावून घेतो व टेबलावर ठेवतो. त्याला उचलून खालीं ठेवतो. बाबू त्याच्याशीं दंगामस्ती करून त्याच्या मनगटाला चावतो. अण्णा त्याच्या मुस्कटांत भडकावतो. बाबू त्याला शिव्या देत लाथा मारतो. इतक्यांत टांगेवाला दाराशीं येतो.)

टांगेवाला : काय रावसाब, आमचे पैसे देणार कीं नाहीं ? पाव कलाक झाला. किती यळ थांबायचं अमी ?

सोनटक्के : अरे, खरंच कीं रे विसरलों बाबा ! रामभाऊ ! मला वाटलं तुम्ही भागवलं याचं भाडं.

रामभाऊ : म्हटलं, उगीच तुम्ही रागवायचे.

सोनटक्के : बरं, किती पैसे द्यायचे बाबा तुला ?

टांगेवाला : आठ आणे.

सोनटक्के : (खिसे चांचपून) अरेच्या ! सुटे पैसे संपले वाटतं सगळे ! अरे दहा रुपयांची मोड आहे कां रे तुझ्यापाशीं ?

टांगेवाला : धा आणे बी नाईत कीं—

सोनटक्के : रामभाऊ, तुमच्याकडे आहेत का हो आठ आणे सुट्टे ? असतील, बघा.

रामभाऊ : माझ्या खिशांत ही एक फक्त चवली आहे बघा सुट्टी. बाकी सगळ्या शंभर शंभरच्या नोटा आहेत.

सोनटक्के : अप्पासाहेब, जरा आठ आणे असले तर बघा हो ?

अण्णा : अहो शेजारच्या हॉटेलांत मिळेल कीं तुम्हांला मोड. आमच्याकडेही नसतील आठ आणे सुटे. कालच–(खुर्चीवर चढून खुंटाळ्यावरच्या अप्पाच्या कोटांतून बाबू पैशांचें पाकिट काढतो.)

बाबू : दादा किती पाहिजेत तुला ? हे घे, हवे तितके पैसे आहेत ह्याच्यांत. (पाकिटांतलें पैसे बाहेर काढतो.)

अण्णा : (त्याच्या हातांतलें पैशांचें पाकिट व पैसे हिसकावून घेऊन त्याच्या पाठींत एक धपाटा मारतो.) गाढवा, चोऱ्या करतोस का अशा ? देऊं का पोलिसाकडे ? कुणीं शिकवलं तुला चोऱ्या करायला ?

बाबू : दादानं. कां मारलंस मला ? तूंच गाढव-तुलाच देतों पोलिसांकडे. (त्यांच्या अंगावर थुंकतो व लाथा झाडतो.)

अण्णा : अहो सोनटक्के, तुम्ही दुसरीकडे कुठें तरी सोय पाहा बुवा. आमच्या इथं नाहीं जमायचं तुमचं.

अप्पा : अरे अण्णा, हें काय वेड्यासारखं ? अरे पाहुणे आहेत आपल्याकडे ते.

टांगेवाला : अहो, टक्के रावसाहेब ! माझे पैसे देऊन टाका कीं लवकर ! किती वाट पाहायची ! द्या लवकर पैसे !

सोनटक्के : (हात जोडून) अप्पासाहेब, प्लीज जरा सहा आणे द्या ना ! रामभाऊंच्याकडे दोन आणे आहेत. म्हणजे ह्या टांगेवाल्याची ब्याद तरी जाईल इथून !

अप्पा : अण्णा, दे रे त्यांना सहा आणे.

अण्णा : काढा पाहूं तुमची ती दहा रुपयांची नोट !

सोनटक्के : (खिसे तपासून) अहो रामभाऊ, मी सोलापूरच्या स्टेशनवर दिली होती ना हो तुम्हांला ती दहाची नोट ?

रामभाऊ : अहो, ती दहाची नव्हे, पांचाची होती. आणि तुमचीं तिकिटं काढून नाहीं का सव्वातीन आणे दिले तुमचे तुम्हांला लागलीच ?

सोनटक्के : अरे खरंच कीं ! ते सगळे वाटेंतच खर्च झाले, नाहीं का ? स्टेशनवर हमाली दिली. आणि—

टांगेवाला : (चिडून) अहो राव, पैसे द्यायचे आहेत कीं नाहीं सांगा पाहूं ! खिशांत नाहीं कवडी अन् दहा रुपयांची मोड मागताहेत !

सोनटक्के : ए, जास्त बोलायचं काम नाहीं !

टांगेवाला : पैसे टाका आधीं आमचे ! काढा पाहूं दहाची नोट, देतों तुम्हांला मोड. उगीच मिजाशी करतात !

सोनटक्के : अप्पासाहेब, आय प्रे टु यू, प्लीज गिव्ह मी एट् अनाज्.

अप्पा : अण्णा, अरे दे कीं त्या टांगेवाल्याला आठ आणे. उगीच त्याची खोटी कशाला विचाऱ्याची !

सोनटक्के : अन् जाऊं दे एकदाचा त्या हलकटाला !

टांगेवाला : तोंड संभाळून बोला राव, कुणाला हलकट म्हणतां ?

सोनटक्के : अरे हो ! मोठा दम भरायला लागला आहे ! तुझ्यासारखे छप्पन्न पाहिले आहेत !

टांगेवाला : पन् मी तुमच्या वानी एक बी नाहीं पाहिलं गिऱ्हाईक !

सोनटक्के : तुझा नंबर काय रे ?

टांगेवाला : २५१. घ्या लिहूनश्यान! अन् जा फरासखान्यांत म्हंजे ते तुम्हांला येरवड्यालाच पाठवतात कीं नाहीं बघा!

अण्णा : (त्याला आठ आणे देतो) हे घे तुझे आठ आणे, अन् गप रहा आतां. जरा थांब हं. अहो मिस्टर सोनटक्के, मला एक नामी कल्पना सुचली आहे. हें बघा, आमच्या ह्या एवढ्याशा खोलींत आपली सर्वांची फार गैरसोय होईल. बंडगार्डन रोडवर आमच्या मामांचा सुंदर मोठा प्रशस्त बंगला आहे. तिथें जागाही भरपूर आहे. नोकर चाकर तुमच्या तैनातीला आहेत. मोटार आहेच. आपली मी तिथं उत्तम सोय करून देतों. अरे टांगेवाला, (त्याला हळूच डोळ्यानें खूण करून) स्टेशनच्या मागें कोल्हापूरच्या महाराजांचा तो मोठा राजवाडा माहीत आहे ना तुला? त्याच्या शेजारींच रावबहादूर देशपांड्यांचा मोठा निळा बंगला आहे बघ. तिथें घेऊन जायचं यांना. मी तुला आगाऊ इथंच तुझं भाडं देतों. ह्यांना त्रास देऊं नकोस तिथं गेल्यावर. का? नेशील ना नीट?

टांगेवाला : भाडं मिळाल्यावर कां नेणार नाहीं रावसाहेब! मग टांगा कशाला जोडला आहे हो?

अण्णा : शाबास. बरं का मिस्टर सोनटक्के, आपण सर्व ह्याच टांग्यांतून बसून जा तिकडे. मी मामाला टेलिफोन करून आलोंच तुमच्या मागोमाग. म्हणजे चहाची, फराळाची तयारी राहील. मग चला. बसा जाऊन टांग्यांत. उगीच उशीर कशाला?

सोनटक्के : काय रामभाऊ, चलायचं? छान सोय झाली!

रामभाऊ : चला कीं! आमचं काय? तुम्ही न्याल तिकडे जायचं!

सोनटक्के : मी सांगितलं नव्हतं तुम्हांला, अप्पासाहेबांकडे अगदीं उत्तम सोय होईल म्हणून? आम्ही त्यांना परके का आहोंत? काय हो अण्णासाहेब?

अण्णा : भलतंच कांहीं तरी! आम्ही आपलेच. हं चला आतां (बाबूसह दोघे जाऊं लागतात; सामान उचलूं लागतात.)

अण्णा : आपण नका नेऊं तें. टांगेवाल्याकडून मी तें ठेववतों. आपण जाऊन बसा टांग्यांत.

सोनटक्के : आपण नक्की येतां ना आमच्याबरोबर ?

अण्णा : नक्की म्हणजे ? हे पहा चढविलेच कपडे.

सोनटक्के : अप्पासाहेब, आपण हो ?

अण्णा : आम्ही दोघे बरोबरच येतों तुमच्या मागोमाग.

सोनटक्के : बरं, मग आम्ही होऊं पुढं ?—खरं, पण भाड्याची व्यवस्था करतां ना आपण ?

अण्णा : त्याची काळजी अगदीं नको. मी देतों तुझे पैसे बरं का रे टांगेवाला ? आपण चला. (बाबूसह दोघे जातात.)

अण्णा : (दूरवर पाहून) बसले एकदाचे टांग्यांत. अरे टांगेवाला, आतां नीट ऐक मी काय सांगतों तें. हे घे आधीं तुझे आणखी आठ आणे ; आणि हें बघ, ह्या लोकांना सरळ येरवड्याच्या वेड्याच्या इस्पितळापाशीं नेऊन सोड. समजलं ?

टांगेवाला : बराबर नेतो बघा.

अण्णा : उचल सामान, अन् पळ ! पुनः जर का त्यांना इथं घेऊन आलास तर खबरदार ! एक छदाम नाहीं मिळायचा !

टांगेवाला : तेची नको आपल्याला काळजी. बराबर सोडून येतों. (सामान घेऊन जातो.)

अप्पा : अण्णा ! कमाल आहे बुवा तुझी.

अण्णा : हं अप्पासाहेब, चढवा आतां कोट टोपी अन् पडा बाहेर. आतां इथं राहून उपयोगीं नाहीं. आतां जें बाहेर पडायचं, तें रात्रींचा १० चा शो पाहून १२ वाजतां परत यायचं ! पाहुणचाराप्रीत्यर्थ एक रुपयाचा भुर्दंड बसला, त्यांत आणखी आठ आणे ! चला. (दोघे जातात.)

खेळखंडोबा

कमलावती : (एका खुर्चीवर संचित बसली आहे) काय करावं बाई, मोठी पंचाईत आहे! माझ्या सरोजच्या भावानें मंजूताईच्या विरुद्ध नुकतंच युद्ध पुकारलं; आणि अशा वेळीं तिनें वेड्यासारखा आपल्या या गुप्त कारस्थानाचा हा लखोटा माझ्याकडे पाठवला. पण ही गोष्ट मंजूताईला तर कळली नसेल ना? (जरा वाट पाहाते. नंतर अत्यंत त्रासिक मुद्रेनें एका विंगकडे पाहून प्रभावतीस लवकर येण्याबद्दल हातानें सूचना करते.)

प्रभावती : (प्रवेश करून) कळली, कळली. कमलावतीबाईसाहेब, ती गोष्ट महाराणीसाहेबांना आतांच कळली; आणि म्हणूनच त्यांनीं मला आपल्याकडे मोठ्या तांतडीनं पाठवलं आहे. बाईसाहेब, माफ करा, मला आपली झडती घेण्याची आज्ञा झाली आहे. तेव्हां – तेव्हां (पुढचें आठवत नाहीं. गोंधळून जाते. कमलावतीस जरा हलक्या आवाजांत) ए गोदे पुढें ग काय? (गोदी डोळे वटारते). इश्श, डोळे वटारायला काय झालं एवढं? मी पुढचं विसरलें, अन् लोकांच्या देखत फजिती होऊं नये म्हणून तुला मी विचारतें. सांग कीं—

कमलावती : तेव्हां ताईसाहेब, आपण मला—

प्रभावती : तेव्हां ताईसाहेब आपण मला – इश्श, अर्धवटच काय सांगतेस अशी? अग, मी तें सगळंच विसरलें. ए, नाहीं तर तूंच माझ्यावाटचं संपवून टाकेनास तें भाषण.

कमलावती : (विंगकडे पाहून) बाई, म्हणूं का हो तिचं भाषण? अगबाई! बाई बघ किती रागावल्या आहेत! आतां आपलं काम संपल्यावर आंत जायची मुळीं सोयच नाहीं! पण करायचं काय? फजितीची वेळ आली तेव्हां म्हणतेंच झालं! हं, कुठवर आलं होतं? हं,

आपण मला क्षमा करावी अशी मी आपणांला हात जोडून विनंति करतें. माझ्या अगदीं जिवावर आलं आहे हें सगळं, पण काय करणार? मी फक्त हुकमाची ताबेदारीण. आतां माझं भाषण सुरू हं! प्रभे, आलीस तशी चालती हो पाहूं इथून! लखोट्याची बातमी अगदीं खोटी आहे. माझ्यापाशीं मुळींच नाहीं कसलाही लखोटा विखोटा! आणि ऐक, नीट ऐक, मंजूताई जर स्वत: येऊन माझी झडती घेऊं लागेल तर मी तो फाडून टाकीन, समजलीस? हं पुढें—

प्रभावती : आपण जर तो फाडलात तर राणी सरकार माझ्याकडे डोळे फाडून बघतील त्याची काय वाट?—

कमलावती : अग थांबलीस काय अशी बावळटासारखी मध्येंच?

प्रभावती : अग! मास्तर नव्हते का म्हणाले, कीं इथें प्रेक्षकजन नक्की हसणार म्हणून? मी त्यांच्या हसण्याची वाट पाहात आहें.

कमलावती : अगबाई! खरंच कीं, अगदींच विसरलें होतें मी! हा विनोद नाहीं का? नाटक म्हटलं, कीं त्यांत विनोद हा असलाच पाहिजे नाहीं? नाहीं हसत कोणी! तूंच हस झालं; आणि कर पुढें सुरू—

प्रभावती : (हसून) ताईसाहेब, आपण माझ्यावर एवढी कृपा कराच. अगबाई! खुद्द राणी सरकारांची स्वारी आली वाटतं!

कमलावती : गंगे, कित्ती बावळट आहेस ग? अग विंगकडे पाहून म्हणायचं हें. तरी मास्तरांनीं बजावलं होतं दहादां. खा आतां बोलणीं.

प्रभावती : खरंच कीं ग! अगदीं वेळेवर सुचवलंस, थँक्यू हं. (विंगकडे पाहून) ताईसाहेब, आपण माझ्यावर कृपा कराच. अगबाई! खुद्द राणीसरकारांची स्वारी आली वाटतं!

(राणीसरकार उलट्या बाजूच्या विंगेनें प्रवेश करतात.)

राणी : (रागानें) कमल, तुझ्या त्या बालमैत्रीण सरोजिनीनं तुझ्याकडे गुप्तपणें एक लखोटा पाठविला आहे, ही गोष्ट खरी आहे काय?

कमलावती : मंजूताई, ही गोष्ट निखालस खोटी आहे.

राणी : कमल, तूं फार म्हणजे फारच खोटें बोलत आहेस. पाहा, माझ्याकडे एकदा नीट पाहा. मी पाहा रागानें कशी लाल झाली आहें! तेव्हां मुकाट्यानें तो लखोटा माझ्या स्वाधीन कर. नाहीं तर – नाहीं – तर (विंगपाशीं जाऊन) ए, पुढें ग काय? (आंतून प्रॉम्टर हळूच सांगते. परंतु राणीसाहेबांना ऐकूं येत नाहीं; म्हणून बाहेर आलेल्या प्रॉम्टरच्या हातांतून रागानें वही हिसकावून घेऊन त्यांतून वाचतात.) नाहीं तर मला तुझी आणि तुझ्या ह्या वाड्याची झडती घ्यावी लागेल, समजलीस? तुला 'आपल्या बहिणीपेक्षां मैत्रीण जास्त प्रिय वाटते होय? थांब चांगलीच कडक शिक्षा केली पाहिजे तुला—

कमलावती : मंजूताई, नको ग इतकी निष्ठुर होऊंस. खरोखरच माझ्याकडे तूं म्हणतेस तसला लखोटा मुळींच आला नाहीं. सांग मंजूताई, सांग, कशी तुझी खात्री करून देऊं? सांग.

राणी : थांब. माझी मीच खात्री करून घेतें. कोण आहे ग तिकड?

प्रभावती : ही मी आहें ही इकड, सरकार, ठरल्याप्रमाणं—

राणी : प्रभे, हिला एकदम गिरफदार करा आणि हिची एकदा चांगली झडती घेऊन तो लखोटा पाहून काढा.

(प्रभावती टाळी वाजवते. तीन चार मुली हातांत दोऱ्या घेऊन येतात. कमलावतीचे हात बांधण्याकरितां 'मी बांधणार' 'मी बांधणार' म्हणून आपापसांत भांडतात व शेवटीं प्रत्येकजण आपल्या दोरीनें तिचे हात बांधते. तिच्या उजव्या हातांतील रुमालांत लखोट्याची अगदीं लहान करून ठेवलेली घडी सांपडते. राणीसाहेब ती घेऊन वाचतात.)

राणी : अस्सं काय? एकूण असं आहे होय तुमचं कारस्थान? तुझी सरोज आपलं वेषान्तर करून तुला परवां पहाटे मोतीबागेंत भेटणार आहे होय? पाहातें कशी भेटते ती? प्रभे, त्या वेळेस तुम्ही सर्वजणी तिथं असा. तिथल्या तिथं आपण तिचा शिरच्छेद करूं.

कमलावती : नको, नको, मंजूताई, नको ग माझ्या सरोजचा असा घात करूं! छे, छे! माझ्याच्यानें आतां हें मुळींच सहन करवत नाहीं. मंजूताई, माझ्यावर दुःखाचा कडेलोट होत आहे! खोटं वाटतं होय तुला? तर मग ऐकच—

पद १ लें (राग : भैरव, ताल : दादरा)

नमुनि विनवि तव भगिनी। करिं दया कृपाळे॥ ध्रु०॥
प्रिय सरोज, तूंही प्रिय। अंतरिं ना भेदभाव॥
जीवदान देउनि तिज। मारिं मज दयाळे॥ १॥

(पद चालू असतां प्रभा माना हलवते. पद संपल्यावर)

कमलावती : गंगे, मी गातांना मारे माना हलवीत होतीस. काय ग अर्थ कळला तुला या पदाचा?

प्रभावती : मोठी आली आहे आजीबाई अर्थ विचारायला! अर्थ समजला म्हणजेच माना हलवाव्यात असं कुठें शास्त्र आहे वाटतं! अन् काय हो आजीबाई, नाटकांतल्या पदांना कधीं अर्थ असतो वाटतं!

राणी : पुरे करा ग तुमचं. भांडायला काय लागलांत आचरटा-सारख्या इकडे. आपण स्टेजवर आहोंत ना? असो. कमल, राजद्रोह हा अत्यंत भयंकर गुन्हा आहे, समजलीस? आणि त्याबद्दल—

[एक मुलगी घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करते व स्वतःच्या कपाळावर हात मारते.]

एक मुलगी : हाय, हाय! घात झाला! सर्वस्वीं घात झाला! भयंकर घात झाला!

सर्व मुली : (एकदम) अग, काय झालं तरी काय असं?

एक मुलगी : (पुढें येऊन व हात जोडून) प्रेक्षकजनहो! खरोखरीच भयंकर घात झाला! आमच्यावर परमेश्वर कोपला. ऐन वेळीं दैवानें दगा दिला. आमच्या मधल्या पडद्याचं म्हणे कायसंसं मोडलं आहे, अन् तो कांहीं केल्या मुळीं खालींच येत नाहीं. तेव्हां आपणा तमाम लोकांस हात जोडून माझी अशी नम्र विनंति आहे, कीं इथें आम्ही मोतीबागेचा सीन तयार करीपर्यंत आपण कृपा करून एक चारपांच मिनिटांकरितां

बाहेर जाऊन आपले अवघडलेले पाय जरा मोकळे करून याल तर आमच्यावर अनंत उपकार होतील. (जरा विचार करून) पण थांबा, तसं नको. एक चांगली युक्ति सुचली. बाहेर जाऊन येण्यापेक्षां इथेंच बसून आपण आमच्याकडे दोनचार मिनिटं सहानुभूतिपूर्वक दुर्लक्ष केलंत तरी चालेल. मग कबूल ना? झालाच सीन तयार हां हां म्हणतां. (जाते.)

राणी : (वहींत पाहून) आणि कमल, ऐक. तुला ह्यावद्दल देहान्त प्रायश्चित्त घ्यावं लागेल, समजलीस! आणा ग तिला माझ्या वाड्यांत. (जाते.) (सर्वजणी जाऊं लागतात. आंतून कोणी कांहीं तरी सूचना करते. तेव्हां जातांना खुर्च्या व कोच आंत नेतात.)

(मघांची मुलगी पांचसहा मुलींसह येते व त्यांना स्टेजच्या दोन्ही बाजूंस विंगच्या शेजारीं अंतराअंतरावर उभ्या करते व पूर्ववत पुन्हा पुढें येऊन हात जोडून उभी राहाते.)

एक मुलगी : प्रेक्षकजनहो, इथें एक लहानशी टीप द्यावयाची आहे. नाट्यकलेचा उत्कर्ष करण्याचें उच्च ध्येय पुढें ठेवून आम्ही नुकताच आमचा हा 'नाट्यकलादर्शक भगिनीसमाज' काढला आहे. व्हावी तितकी आर्थिक मदत न झाल्यामुळें आमच्या गरीब समाजाला सीनसीनरीचा फार तुटवडा आहे. तेव्हां नाट्यकलेंतील आमच्या नैपुण्यावर आपण संतुष्ट होऊन आमच्या गरीब संस्थेस सढळ हातानें मदत करून ऊर्जितावस्थेस आणाल अशी आशा, नव्हे पक्की खात्री आहे. असो. प्रेक्षकजनहो, हा पाहा आमच्या मोतीबागेचा सीन; ती पाहा लाजरी लतिका तिकडे कशी उभी आहे! (एकेका मुलीकडे बोट दाखवून) पहा, प्रेक्षकजनहो, बाग कसा फुलांनीं फुलला आहे तो! ती शेवंती, ही गुलाब, ही कुसूम, ती सुमन, कमळ वगैरे वगैरे. कां, ठीक आहे ना आमचा सुंदर बगीचा? (जाते. राणी, प्रभा व चार पांच मुली प्रवेश करतात.)

राणी : मुलींनो, लपून बसा नीट कुठें तरी झाडांच्या मागें; अन् मी टाळी वाजवल्याबरोबर या धावत एकदम. (सर्वजणी मुजरा करून जातात. राणी लपते.)

सरोजिनी : (प्रवेश करून) अहाहा! किती सुंदर बगीचा आहे पण हा. कमलची वाट पाहात कुठें बरं बसावं? इथेंच उभं राहावं झालं. किती सुंदर गुलाब आहे हा! तोडूं का?

गुलाब : (ती जवळ आल्यावर घाबरून) नका हो तोडूं. माझ्याशीं दुरूनच बोला.

सरोजिनी : अगबाई! फूल माझ्याशीं बोलूं लागलं! काय तरी बाई चमत्कार! मी भानावर तर आहें ना? का एकाएकीं कवयित्री बनलें. पण अजून कमल कां बरं येत नाहीं? (राणीसरकार येतात; टा[illegible] वाजवितात; सर्व मुली येतात व तिला पकडून तिच्या मुसक्या बांधतात.)

सरोजिनी : (धडपड करीत) अग, मीं काय केलं? मला क[illegible] पकडतां? मला कां पकडतां?

त्यांतील एक मुलगी : अग नाटकांत तसं लिहिलं आहे म्हणून. समजलीस?

राणी : सरोजिनी, अशा कपटी वेषानं येऊन माझ्या बहिणीला राजद्रोहासारखा भयंकर गुन्हा करण्यास प्रवृत्त करतेस काय? वेडे, याचा परिणाम मात्र असा होणार आहे, कीं तुझ्याबरोबर विचारील तिला सुद्धा देहान्त प्रायश्चित्त घ्यावं लागणार आहे!

सरोजिनी : राणीसाहेब, आपण दयाशील आहांत. माझा वाटेल तर आतांच शिरच्छेद करा, पण माझ्या कमलला क्षमा करा. ती अगदीं निरपराधी आहे.

राणी : तें होणं आतां शक्य नाहीं! आमच्या दरबारचा न्याय भयंकर कडक आहे! याचा विचार आधींच करायला पाहिजे होतास!

एक मुलगी : (घाईघाईनें प्रवेश करून व मुजरा करून) राणी-सरकार, घात झाला, कमलावतीबाईसाहेब फरारी झाल्या.

सरोजिनी : अहाहा! परमेश्वरा! कसे तुझे उपकार स्मरूं? आतां मला खुशाल ठार करा. माझी कमल बंधमुक्त झाली. किती आनंद झाला म्हणून सांगूं? आतां मला गाणं म्हटलंच पाहिजे.

राणी : ए मुलींनो, हिला नीट धरून ठेवा. हिचं गाणं संपेपर्यंत आम्ही त्या झाडाखालीं बिझिकचे दोन चार डाव खेळून येतों. चल प्रभे. (दोघी जातात.)

पद २ रें (राग : पिलु, ताल : त्रिताल)

सरोजिनी : **प्रभुजी वानुं केवी उपकार ॥ ध्रु० ॥**
जीव सुमन मम वाहिन चरणीं ।
करिं देवा स्वीकार ॥

(पद संपल्यावर राणी व प्रभा प्रवेश करतात.)

राणी : प्रभे, हिला तूर्त कडेकोट बंदोबस्तांत ठेवा आणि कमलच्या शोधाकरितां दाही दिशांना माणसं पाठवा.

चार पांच मुली : (प्रवेश करून मुजरा करतात) राणीसरकार, आनंदाची बातमी ! शत्रु ठार झाला. उदेसिंगाचा त्याच्याच एका सरदारानें खून केला.

सरोजिनी : हाय हाय दैवा ! काय ऐकतें मी हें ! हें दुःख मात्र आतां मला मुळींच सहन करवणार नाहीं ! मी आतां धाडकन् मूर्च्छित होऊन पडतें. (इतर मुली सावरत आहेत असें पाहून बेतानें पडते.)

राणी : हिला घेऊन चला ग माझ्या वाड्यांत. (जाते. बाकीच्या मुली तिला उचलून आंत घेऊन जातात.)

(मघांची ' एक मुलगी ' येऊन हात जोडते. इतक्यांत एक मोठा बार होतो व गुलाब वगैरे मुली आंत जातात. एक शुभ्र व एक काळसर रंगाचें अशीं वस्त्रें परिधान केलेल्या दोन मुली स्टेजच्या एकाच बाजूनें पण बऱ्याच अंतरावरून निघून अगदीं सावकाश येऊन स्टेजच्या मध्यावर एकमेकींच्या हातांत हात घालून दुसऱ्या बाजूकडे तोंडें करून उभ्या राहातात.)

एक मुलगी : प्रेक्षकजनहो ! टीप नं. २. हा ट्रॅान्स्फर सीन आहे. आमच्याकडे सीनसीनरी नाहीं म्हणून मघांशींच सागितलें. आतां आपल्या कल्पनाशक्तीची थोडीशी परीक्षा आहे. इथें नाटककारानं

लिहिलं आहे, ‘ स्थळ–गंगायमुनेचा संगम ’. हा पाहा आमच्या गंगीनें आणि यमीनें कसा सुंदर सीन तयार केला आहे तो. (जाते.)

कमलावती : (प्रवेश करून) मी बंधमुक्त झालें खरी, पण बिचारी सरोज मात्र माझ्या मूर्खपणामुळं प्राणास मुकली. आतां मला तरी जगून काय करायचं आहे ! मुद्दाम ह्या पवित्र क्षेत्राच्या ठिकाणीं आलें. स्वर्गांत सरोज मोठ्या आतुरतेनें माझी वाट पाहात असेल, तेव्हां उगीच उशीर कां करावा ? (विंगमधून कोणीतरी एक मोठें स्टूल देतें, तें घेते व गंगायमीच्या मागें ठेवते. त्यावर उभी राहून हात जोडते.) मातुश्री गंगामाई, आतां ह्या पापी जगांत राहाणं नको. ही मी आलें तुझ्याकडे. आटप, घे लवकर मला आपल्या उदरांत. (गंगी-यमीच्या मागें उडी मारते व त्यांच्या मागोमाग आंत जाते.)

(पुन्हा बार होतो. पांचसहा मुली एका कोचावर अत्यंत अस्वस्थ झालेल्या राणीसाहेबांस कोचासकट उचलून स्टेजवर आणतात. दोन चार खुर्च्या आणून ठेवतात. एक मुलगी स्टुलावर एक स्वच्छ तांब्याभांडें वगैरे सामान आणून ठेवून तें कोचापाशीं ठेवते. दोन मुली पंख्यानें वारा घालतात. तिघी राणीसाहेबांचे पाय दाबतात व चौघी कपाळ चेपतात.)

प्रभावती : ह्या सगळ्याजणी कांहीं ना कांहीं तरी करीत आहेत. आतां मी कशी बरं करूं राणीसरकारांची सेवा ? हं आठवलं. आतां एवढंच काम शिल्लक राहिलं आहे. (स्टुलावरील तांब्यांतील पाणी भांड्यांत ओतून व तें त्यांच्या तोंडापाशीं नेऊन) राणीसरकार, जरा घोटभर पाणी प्या, म्हणजे दु:खावेग कमी होऊन जरा जिवाला बरं वाटेल—

राणी : (संतापून) मेले, थांब. तो तांब्याच घालतें तुझ्या डोक्यांत ! पाणी ग कसलं पाजतेस मला इतक्या लवकर. बरं पण तें असूं दे. (कोचावरून उठून व तिच्यासह स्टेजच्या पुढें येऊन) प्रभे, विषयांत आणि आवाजांत एकदम बदल करतें हं मी. बोल, प्रभे बोल. भगिनीहत्येचं भयंकर पातक मी कोणत्या जन्मीं फेडूं ?

प्रभावती : त्याची चिंता आपल्याला कशाला बरं सरकार? तें आपल्या इच्छेवर थोडंच अवलंबून आहे ! कमलावतीबाईसाहेबांच्या ावानें आपल्या जवळच्या लोकांस, निकटच्या सेविकांना दानधर्म करा, म्हणजे ह्या पापाचं प्रायश्चित्त घेतल्यासारखं होईल.

राणी : बिच्यारी माझी कमल ! प्रभे, मी अत्यंत कठोर हृदयाची नव्हे ग ?

प्रभावती : हें काय विचारणं, सरकार? हें काय विचारणं ?

राणी : प्रभे ! माझ्या कमलच्या मृत्यूचं हें दारुण दुःख मी कसं ग सहन करूं ?

प्रभावती : नाट्य–नृत्य–गायनादि विविध कार्यक्रम करवून मनरंजन करावं, सरकार ! मी करून दाखवूं का नृत्य ?

राणी : चालती हो इथून. नृत्य करते मेली ! छे ! छे ! नकोत ह्या असह्य यातना ! कमल, ही मी आलें तुझ्याकडे तुला प्रेमानें आलिंगन द्यायला ! (कट्यार बाहेर काढून छातींत भोसकून घेण्याचा अभिनय करते. दुसऱ्या हातानें लपविलेल्या दौतींतील तांबडी शाई छातीवर ओतते व बेतानें खालीं पडते. इतर सर्व मुली 'हें काय ? सरकार, हें काय ?' असें म्हणत तिच्या भोंवतीं घोळका करतात. प्रभावती सर्वांना दूर सारून तिचें मस्तक आपल्या मांडीवर ठेवते. खंजीर दूर भिरकावून देते.)

प्रभावती : हाय ! हाय ! राणीसरकार, आपण आम्हांला सोडून कमलाताईच्या भेटीकरतां गेलांत खऱ्या ; पण आतां माझं कसं व्हायचं ? (तिच्या नाकापाशीं बोटें धरते व जरा त्रासून हळूच) जरा श्वास बंद कर कीं ! अगदीं खरोखरीची नाहीं कांहीं मरायचीस लागलीच. मुलींनो, जा ! हें दुःखकारक वर्तमान प्रधानजींना जाऊन कळवा. माझ्याच्यानें आतां इथून उठवत नाहीं. मी आतां राणीसरकारांवांचून कशी जिवंत राहूं ? कुणापुढें 'सरकार, सरकार' म्हणत राहूं ? माझं आतां कसं हो होणार ? सांगा ना सरकार, बोला ना एकदा आपल्या लाडक्या

प्रभेशीं. एकदा तरी बोला हो! (विंगकडे पाहते. शिटी वाजते, प्रभा स्वस्थ बसते. पडदा जागच्या जागीं खालीं वर होतो, पण पडत नाहीं. पुनः जोरांत शिटी वाजते, राणी सरकार हळूच उठून बसतात.)

प्रभावती : (गोंधळून जाऊन व दूर उभी राहून) अय्या सुशे! अग काय हें? अग तूं मेली आहेस ना? अजून पडदा नाहीं पडला. (राणी सरकार फारच गोंधळून जातात व विंगकडे पाहून मोठ्यानें—)

राणी : बाबू, पडदा पाड कीं रे लवकर. (पुनः पूर्ववत मृत होऊन पडते. पडदा वाकडा तिकडा होऊन पडतो.)

प्रभावती अय्या! सुशे! अग काय हें? अग, तूं मेली आहेस·ना? अजून पडदा नाहीं पडला. [पृष्ठ ३४

साहेब : Ants have come to my feet.

[पृष्ठ ३७

गावठी साहेब

(साहेब आपल्या खोलींत लिहीत बसले आहेत. टेबलावर डिक्शनऱ्या वगैरे पुष्कळ पुस्तकें आहेत.)

मराठे : (प्रवेश करून) काय साहेब ! काय चाललं आहे ? ग्रंथ-लेखन वाटतं ?

साहेब : Hallo ! Marathe, come along. Sit down. Well, what brings you here ?

मराठे : म्हटलं mountain महंमदकडे येत नाहीं, तर महंमदनेंच जावं mountain कडे.

साहेब : Why, Marathe ! I did go to you on Saturday. But where was your address at home ?

मराठे : माझा जरी घरीं पत्ता नव्हता, तरी लेका, जरा पांचदहा मिनिटं घरीं बसला असतास तर वेळ फार फुकट गेला असता वाटतं ?

साहेब : When you were not at home, what was the use of simply sitting there killing flies ?

मराठे : कां ? माशा मारीत कां ? गोपू नव्हता घरांत ?

साहेब : Yes, Gopal did ask me to wait. But I wanted to go for the 6-30 show. That was the chief story.

मराठे : ही मुख्य गोष्ट होती होय ? बरं, पण काय रे साहेबा, त्या दिवशीं त्या चितळ्याच्या घरीं जेवायला रे कां नाहीं आलास ? बोलावलं होतं ना त्यानें तुला ?

साहेब : Oh ! on that day ? I was surely going to come. But don't you remember, how on that day the rain was saying 'I'?

मराठे : अरे हो! पाऊस 'मी' म्हणत होता म्हणूनच मी तुला टांग्यांतून घेऊन जाण्याकरतां तुझ्या घरीं आलों होतों. पण आपली स्वारी गेली होती बाहेर कुठें भटकिंग करायला!

साहेब : Impossible, Marathe, I say you are simply beating थापा es.

मराठे : थापा मारून काय करायचं आहे आम्हांला. पण तें कांहीं का असेना, एवढं मात्र खरं, कीं त्या दिवशीं चितळ्यानें तुझी चांगली दोन तास वाट पाहिली.

साहेब : Is that so? Then Chitale must have made conch by my name!

मराठे : अगदीं चांगला केला सर्वांनीं तुझ्या नांवानं शंख! शेवटीं कंटाळून तो तुझ्याकडे यायला निघाला होता.

साहेब : Then why did he not come? Where did the fly sneeze in the middle?

मराठे : मध्येंच माशी अशी शिंकली, कीं तो देव म्हणाला, "कशाला जातोस रे! मरूं द्या त्या लेकाला! बसला असेल बावळट त्या डिक्शनऱ्यांत आपलं टाळकं खुपसून एखाद्या कादंबरीचं घाणेरडं भाषांतर करीत!"

साहेब : What a fool he is! If I like to thrust my head in the dictionaries and translate novels in my own house, I ask what does that donkey's father's go?

मराठे : जाऊं दे रे! चिडतोस काय असा साहेबा? त्याच्या बोलण्याकडे काय लक्ष देतोस? लहान आहे अजून तो!

साहेब : Small! Why small!! he must now be quite an eighteen year old horse.

मराठे : अरे, शिव्या कशाला देतोस त्याला? पण तो म्हणत होता, तोही कसलंसं पुस्तक लिहीत आहे. तुझ्यापेक्षां शतपटीनं चांगलं आहे असं तो म्हणत होता.

साहेब : Who ? that Deo ? writing a book ? Marathe, don't you know that " A thundering cloud poureth what and a prattling man acteth what ? "

मराठे : म्हणजे ! गर्जेल तो पडेल काय, अन् बोलेल तो करील काय ? वाहवा रे गांवठी साहेबा ! आपल्या मराठी भाषासुंदरीला विचित्रवर्णांचे विलायती झगे नेसवून कुरूप आणि करपलेली मड्डम् बनविण्याचा मिशनऱ्यांचा धंदा दिसतो आहे तुझा हा ! अशानें का कुठं लेखक होत असतो ? आणि त्या देवाचा उगीच हेवा करतोस. त्याचं पुस्तक पुढच्या महिन्यांत प्रसिद्ध झालं म्हणजे समजेल.

साहेब : All right, all right; the horse and plain have come near.

मराठे : पण तुला जर घोडा मैदानाची वाट पाहावयाची नसेल, तर आतां त्याला घेऊन येतों तुझ्याकडे.

साहेब : (हात जोडून) My mother, please don't. I have no time to waste.

मराठे : मग तूं फिरायला येणार नसशीलच माझ्याबरोबर.

साहेब : Excuse me, Marathe, I must finish this chapter to-day.

मराठे : बरं तर, उगीच तुझा जास्त वेळ कशाला घ्या ! जातों मी.

साहेब : Now, when will our knot fall again ?

मराठे : आपली गांठ ? पडेल अशीच केव्हां तरी. दारापर्यंत पोचवायला तरी ये.

(साहेब उठतो व चालूं लागतो; मध्येंच खालीं वाकून पायाच्या आंगठ्याचें नख खाजवतो.)

मराठे : काय झालं रे पायाला ?

साहेब : Sitting sitting, ants have come to my feet.

मराठे : Then झटक them and come out with me.

(दोघेही जातात.)

इन्टरव्ह्यू

[साहेबांचें ऑफिस. साहेब टेबलावरील पत्रें चाळीत आहेत. घड्याळांत साडे अकराचा ठोका पडतो.]

साहेब : गोंधळेकर !

गोंधळेकर : (आंतूनच 'आलों' म्हणून ८ सेकंदांनीं प्रवेश करतात.) काय ?

साहेब : अहो गोंधळेकर, त्या कामतांच्या जागेकरितां आपण कांहीं ४–५ लोकांना इन्टरव्ह्यूकरितां बोलावलं होतं नाहीं आज ?

गोंधळेकर : होय साहेब, आले आहेत ते. बसवून ठेवलं आहे बाहेर त्यांना.

साहेब : असं का ? मग पाठवून द्या एकेकाला आंत. आज करून टाकूं सिलेक्शन्. एक हॅन्ड कमी असल्यामुळें काम फार शिल्लक पडलं आहे.

गोंधळेकर : ठीक आहे, पाठवतो एकेकाला.

साहेब : त्यांचे ते ॲप्लिकेशन्स कुठें ठेवलेत हो ?

गोंधळेकर : आपणच नऊ नंबरच्या फाइलमध्यें ठेवलेत. (पाहून देतो व जातो.)

भडभडे : (प्रवेश करून आदबीनें नमस्कार करतो.) आपण साडे अकरा वाजतां बोलावलं होतं. पण मी आपला अकरा वाजल्यापासून येऊन बसलों. म्हटलं, अर्धा मिनिट उशीर होण्यापेक्षां अर्धा तास लवकर आलेलं बरं. तुमचे हे गोंधळेकर हेड्क्लार्कही म्हणाले होते कीं आपण वेळेच्या बाबतींत फार पर्टिक्युलर आहांत म्हणून. अन् पाहिजेच हो तसं. मला सुद्धा—

साहेब : (उग्र चेहरा करून) तुमचं नांव काय ?

भडभडे : माझं नांव आहे कीं माझ्या अर्जांत. आहे ना तुमच्यापाशीं तो ? मुद्दाम सबंध नांव लिहिलं आहे. नाहींतर घोटाळा होतो हो.

साहेब : (रागानें) तुमचं नांव काय ?

भडभडे : (हसत) म्हणजे माझें सबंध नांव ! नांव ना ? प्रद्युम्न अनिरुद्ध भडभडे. स्पेलिंग बरोबर आहे ना ? का चुकलं ? मीं आपल्याकडून—

साहेब : मिस्टर भडभडे, जास्त बोलूं नका. फक्त विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें द्या.

भडभडे : विचारा, विचारा, वाटेल तें विचारा. आपणांला येतील तशीं उत्तरं देऊं. हो, एखाद्या प्रश्नाचं नाहीं देतां आलं उत्तर, तर ' उत्तर देतां येत नाहीं ' म्हणून साफ सांगूं. अहो ह्यांत लाज कसली ? मी आहें अगदीं स्ट्रेट्‌फॉर्वर्ड मनुष्य. परवां मी असाच गेलों होतों बरं कां मिस्टर जोशी–

साहेब : स्टॉप् युअर नॉन्सेन्स अ‍ॅट्‌वन्स् ! मॅट्रिकला तुमची टोटल् काय होती ? एका वाक्यांत सरळ उत्तर द्या.

भडभडे : बरोब्बर बाउंडरीवर पास झालों बघा. आतां लक्षांत नाहीं माझ्या किती ती. पण सुटलों बुवा एकदांचा तिसऱ्या खेपेस. प्रत्येक वेळीं निरनिराळ्या विषयांत व्हिक्टोरिया क्रॉस्. ही मॅट्रिकची—

साहेब : (ओरडून) गप्, किती बडबडतां ? सांगितलं ना एकदां थोडक्यांत उत्तर द्या म्हणून ! अशींच भरमसाट उत्तरं लिहिल्यामुळं नापास झालां असाल—

भडभडे : चुकतां आहांत मिस्टर जोशी. अहो—

साहेब : शटप् !

भडभडे : अहो, ऐकून तर घ्या माझं–

साहेब : गप् बसतां कीं नाहीं ! ' मिस्टर जोशी ' काय म्हणतां ? तुम्ही कुठं, कोणत्या कामाकरितां आणि कुणापुढं उभे आहांत ?

भडभडे : म्हंजे काय ? आपलं नांव जोशी नाहीं ? काय चुकलं मला मुळीं कळतच नाहीं ?

साहेब : 'साहेब' म्हणा.

भडभडे : 'साहेब' ? मी म्हटलं तुम्ही आमच्यापैकींच, तेव्हां—

साहेब : तुम्हांला टायपिंग येतं का ?

भडभडे : अहो, त्यांत हो काय मोठं ? उद्यां क्लास जॉइन् केला, कीं तीन महिन्यांत येईल. आमचे वडील होते की शार्ट हँड् टाइपिस्ट.

साहेब : गेल्या महायुद्धाचीं कारणं काय ?

भडभडे : अहो, त्याचीं अशीं थोडक्यांत सांगण्यासारखीं एक दोन का कारणं आहेत, जोशी-साहेब ? सगळीं सांगत बसलों तर चार पांच तास पुरायचे नाहींत राव ! पांच तास. आहांत कुठं ? माझं काय ? मला आहे वेळ; पण तुमचं आपलं तुम्ही पाहा. खरं सांगूं ? हिटलर होता मूर्ख. त्यानं त्या महामूर्ख मुसोलिनीला बनवला होता चांगला. हें आपलं माझं मत आहे हो.

साहेब : बरं तुम्ही आतां जा आणि ह्या विषयावर सुमारें तीस ते पस्तीस पानें निबंध लिहून पोस्टानें पाठवा.

भडभडे : म्हंजे ? संपला का इन्टरव्ह्यू ? कामाला कधींपासून येऊं ? अन् काय हो, पगार काय मिळणार आम्हांला ? हो ! आपलं अगोदरच स्पष्ट विचारलेलं बरं !

साहेब : तुम्ही आतां एकदम बाहेर जा पाहूं. सगळं कळवूं तुम्हांला पोस्टानं जरूर लागली तर.

भडभडे : म्हंजे काय ? अहो तुम्हांला जरूर आहे ना ? मग बोलावलं कशाला आम्हांला ? असं नको करूं बुवा—

साहेब : (मोठ्यानें ओरडून) गेट् आऊट्.

भडभडे : हा निव्वळ हिटलरिझम् आहे तुमचा. (जातात.)

साहेब : (स्वतःशीं) काय मूर्ख मनुष्य ! दहा वर्षं वाट पाहा लेका नोकरीकरितां. इडियट्.

(नेभळे भीत भीत प्रवेश करतात. दूरवर उभे राहून खूप खालीं लवून मुजरा करतात व दीन मुद्रेनें बावळटासारखे उभे राहातात.)

साहेब : (अधिकारी ऐटींत) टेबलाजवळ या. (नेभळे जरा हलतात व टेबलापासून तीन फूट अंतरावर जमिनीकडे पाहात हात जोडून उभे राहातात.)

साहेब : तुमचं नांव ?

नेभळे : न–ने–नेभळे गो. गो.

साहेब : (त्यांचा अर्ज पाहून) तुमचं अक्षर फार गचाळ आहे, नेभळे.

नेभळे : होय साहेब. पण मी सुधारीन तें. नोकरीवर घेतलंत म्हणजे रोज शुद्धलेखन लिहीन.

साहेब : तुम्ही किती तास काम करूं शकाल ?

नेभळे : एक वेळचं जेवण व ४।५ तास झोंप सोडून सारा वेळ काम करीन साहेब.

साहेब : तुम्ही तुमच्या अधिकाऱ्याला संतुष्ट ठेवण्यासाठीं कसे झटाल ?

नेभळे : ऑफिसचं काम करून रात्रंदिवस हुजुरांच्याच सेवेला हुजुरांच्याच घरीं राहीन. रोज भाजी आणीन. सगळा बाजारहाट करीन मुलांना संभाळीन. त्यांना फिरायला नेईन. बाईसाहेबांचं सगळं काम करीन.

साहेब : पगार काय घ्याल ?

नेभळे : महाराज देतील तो. पोटाला दोन घास नि अंगावर चार चिंध्या असल्या म्हणजे बस् आहे मला, साहेब.

साहेब : तुमच्या घरीं कोण कोण माणसं आहेत ?

नेभळे : वडील, सावत्र आई, सख्खीं भावंडं सहा नि सावत्र पांच. मी सर्वांत वडील.

साहेब : वडील काय करतात ? त्यांना काय मिळतं ?

नेभळे : ते म्युनिसिपालिटीच्या शाळेंत मास्तर आहेत.

साहेब : तुम्हांला घेतलं असतं मी नेभळे; पण तुमचं अक्षर फारच भिकार आहे हो. इथें तर दिवसभर खर्डेघाशी करावी लागते नि अक्षर चांगलं असावं लागतं. तेव्हां मला वाईट वाटतं, तुम्हांला घेतां येईलसं नाहीं वाटत मला.

नेभळे : असं करूं नका हो मेहेरबान्. मी तुमच्या पायां पडतों. मला अन्नाला लावा. मी तुमचे उपकार जन्मजन्मांतरीं विसरणार नाहीं. मोठ्या आशेनें आलों हो मी. (अत्यंत केविलवाण्या मुद्रेनें त्यांच्याकडे पाहातो.)

साहेब : I'll see what I can do for you. बरं, आतां तुम्ही बाहेर जाऊन बसा जरा वेळ.

नेभळे : जातों. साहेब, गरिबावर दया करा. (जातो.)

ब्रह्मे : (हसऱ्या चेहेऱ्यानें प्रवेश करतात व उजव्या हाताच्या एका बोटानें ऐटींत सलाम करून टेबलासमोरच्या एका खुर्चीवर बसतात.) Good Morning.

साहेब : तुम्हांला बसायला कुणीं सांगितलं ?

ब्रह्मे : बसायला कुणीं कशाला सांगायला पाहिजे ? मला वाटलं, खुर्च्या बसण्याकरतां असतात.

साहेब : Get up, and stand there. Manners कुठें शिकलां तुम्ही ?

ब्रह्मे : भले ! मी विचारायचा प्रश्न तुम्हींच विचारलात होय ?

साहेब : माझ्या प्रश्नांचीं सरळ उत्तरं द्या. तुम्ही बी. ए. कां होऊं शकलां नाहींत ?

ब्रह्मे : मॅट्रिक होऊं शकलों नाहीं म्हणून.

साहेब : तुम्ही मॅट्रिकही नाहीं ? मग ह्या अर्जांत अंडर ग्रॅज्युएट् आहांत असं कां लिहिलंत ?

ब्रह्मे : कारण I am serving under a graduate.

साहेब : विनोद करण्याचा प्रयत्न करूं नका. नि स्वतः बोलून स्वतःच काय हसतां आचरटासारखे ?

ब्रह्मे : ह्या विट्ला कोणताही रसिक हसला असता.

साहेब : तुमच्या विटा इथं नकोत. I am serious. (एका कागदावरून प्रश्न वाचतात.) तुम्हांला इतिहासांतला एक प्रश्न विचारतों— घ्यासुद्दिन अहमद आपल्या बापाच्या गादीवर कां बसला नाहीं ?

ब्रह्मे : त्या गादींत ढेकूण झाले असतील.

साहेब : (रागानें) पुनः विनोद ! सांगितलं ना Serious व्हा म्हणून. नाहीं तर चालते व्हा. तुम्ही नीट उत्तरं देणार कीं नाहीं ?

ब्रह्मे : देणार.

साहेब : तुम्हांला कोणती कला अवगत आहे ?

ब्रह्मे : माझी आवडती कला माझ्या खिशांत आहे.

साहेब : खिशांत ? दाखवा पाहूं कोणती ती.

ब्रह्मे : (खिशांतून बाजा काढून तोंडानें वाजवूं लागतो व नाचतो)

साहेब : पुरे ! आतां भूगोलांतला एक प्रश्न विचारतों. सूर्याला ग्रहण कसें लागतें ?

ब्रह्मे : सांगतों. सूर्य stationary आहे ; पृथ्वी त्याला प्रदक्षिणा घालते आणि चांदोबा पृथ्वीला प्रदक्षिणा घालतो, हें माहीत आहे ना आपणांला ? का नाहीं ?

साहेब : पुढें ?

ब्रह्मे : अहो हीं basic principles आहेत. तीं प्रथम समजलीं, म्हणजे मग पुढचा phenomenon समजेल ; म्हणून विचारलं, बरं, पुढें काय मौज होते, आपली ही पृथ्वी आणि चंद्र असे फिरतां फिरतां अशा कांहीं particular position मध्यें येतात, कीं सूर्याला ग्रहण लागतं आणि ह्याच्या उलट झालं, म्हणजे चंद्राला ग्रहण लागतं.

साहेब : विद्वान् आहांत झालं.

ब्रह्मे : कसचा कसचा ! उगीच आपलं येतं थोडसं.

साहेब : काय हो ब्रह्मे, तुम्ही अर्जाच्या खालीं एखाद्या गव्हर्नरासारखी V. K. Brahme अशी सही केली आहेत. तुमचं संबंध नांव काय ?

अब्बे : ऐका. वैकुंठ कैलास अब्बे, एस्क्वायर, गजेंद्रगडकरांचा वाडा, एक हजार चारशें अठ्ठयाण्णव अपॉन् एकूणनव्वद सदाशिव पेठ, खुन्या मुरलीधराच्या पलीकडची आळी, पुणें दोन.

साहेब : काय हो अब्बे, एखाद्या इसमानें तुमच्या दोन तोंडांत भडकावल्या, तर काय हो विनोद कराल तुम्ही ?

अब्बे : अहो विनोद-सृष्टींतील नवखे मुशाफर साहेब ! विनोदाची महति आपणांस माहीत नाहींशी दिसते. विनोद हें एक जीवनसृष्टींतील रम्य उद्यान आहे, मृत्युलोकांतील दिव्य अमृत आहे, अमोघ शस्त्र आहे, अचूक अस्त्र आहे, मशीनगन् आहे, सबमरीन आहे, टॉरपेडो आहे, ॲन्टी-एअरक्रॅफ्ट आहे आणि ॲटम बॉम्बहि आहे—

साहेब : त्याचा हल्ला आमच्यावर नको. बरं, पण तुम्ही इथं कशाला आलांत ?

अब्बे : पाहिलंत ! विनोद माणसाला दुःखाचा कसा विसर पाडतो तें ?

साहेब : म्हणूनच ह्या दुःखमय सृष्टींत तुम्हांला मीं लोटूं इच्छीत नाहीं. तुम्ही तुमच्या रम्य उद्यानांत बागडा. जा. तुमचा आम्हांला उपयोग होणार नाहीं.

अब्बे : असं कसं बरं म्हणतां साहेब ? माझ्या अंगचा एक गुण तुमच्या खास उपयोगी पडेल.

साहेब : तो कोणता ?

अब्बे : मी आकडेमोडींत पटाईत आहें.

साहेब : असं ? मग बोला, दरसाल दर शेकडा ३ रु. १२ आणे व्याजाप्रमाणें २१३५० रुपयांचें तीन वर्षांचें काय व्याज होईल ?

अब्बे : कुणाचे हो इतके रुपये हे ?

साहेब : लागलात का विनोद करायला ?

अब्बे : बरं नाहीं. जरा कागद पेन्सिल द्या.

साहेब : कशाला ?

ब्रह्मे : म्हणजे Algebra नें दोन मिनिटांत उत्तर काढतों.

साहेब : अहो विनोदमूर्ति, जा आतां तुम्ही. आम्हांला आमच्या ऑफिसांत तुमच्यासारखीं वानरं ठेवायचीं नाहींत.

ब्रह्मे : (हसत) बरं जातों मी. मलाही गंभीर गाढवांच्या हाताखालीं काम करायचं नाहीं.

साहेब : काय म्हणालांत ? पुन्हा म्हणा पाहूं ?

ब्रह्मे : (हसत) ऐकलंत कीं तुम्हीं. पुन्हा कशाला ? तुम्ही चिडलांत, पण मी चिडलों नाहीं. (जातो.)

नरेन्द्र (तडफेनें प्रवेश करतो. टेबलासमोर उभा राहून) नमस्कार.

साहेब : तुम्ही हो कोण ?

नरेन्द्र : म्हणजे, माझं नांव ? एम्. नरेन्द्र.

साहेब एम्. नरेन्द्र ? वहावा रे नांव ! एम्. म्हणजे हो काय ?

नरेन्द्र : मुरुगुडकर.

साहेब : हें आडनांव वाटतं ?

नरेन्द्र : होय.

साहेब : नि यांत वडिलांचं नांव हो कुठं ? का वडिलांनीं हाकून दिलं घरांतून, म्हणून त्यांचं नांव नाहीं ?

नरेन्द्र : त्याच्याशीं तुम्हांला कांहींएक कर्तव्य नाहीं. नोकरीकरतां इन्टरव्ह्यूला आलेल्या उमेदवाराला असले आचरटासारखे प्रश्न विचारण्याची कांहीं एक जरूरी नाहीं.

साहेब : तुम्हीं जरा तिरसट दिसतां हो, मिस्टर नरेन्द्र.

नरेन्द्र : नाहीं. मुळींच नाहीं. पण खुर्चीवर बसलेल्या मनुष्यानें समोर उभा राहिलेल्या गरजू मनुष्याची उगीच हेटाळणी केली म्हणजे मला चीड येते.

साहेब : तुम्ही मोठे तडफदार दिसतां हो. पण आपल्या ह्या जगांत तुमच्यासारख्या लोकांचं नुकसान होतं बरं का, ध्यानात ठेवा.

नरेन्द्र : मला त्याची पर्वा नाहीं.

साहेब : पण तुम्ही एकदा नोकरीवर रुजू झालांत, म्हणजे तुम्हांला तुमच्या जिभेवर नियंत्रण ठेवावं लागेल.

नरेन्द्र : मी कधींही निष्कारण कुणाला दुखविणार नाहीं, पण अन्याय किंवा अपमान होत असेल, तर कधीं सहन करणार नाहीं.

साहेब : तुमच्या आजपर्यंत किती नोकऱ्या झाल्या ?

नरेन्द्र : चार.

साहेब : त्या कां सुटल्या ?

नरेन्द्र : वरिष्ठांशीं न पटल्यामुळें.

साहेब : ह्यावरून तुमच्यांतच कांहीं तरी दोष असेल असं नाहीं का तुम्हांला वाटत ?

नरेन्द्र : मला वाटतं ही खुर्चीची मगरुरी आहे.

साहेब : मग अशाच एका खुर्चीपुढें तुम्ही कां बरं आलांत ?

नरेन्द्र : नोकरीशिवाय गत्यंतर नाहीं म्हणून.

साहेब : होय ना ? मग तुम्हीं असे hopping किती दिवस करीत बसणार ? कुठें तरी स्थिर व्हायला नको का ? उद्यां तुम्हीच ह्या खुर्चीवर बसाल.

नरेन्द्र : पण मी मगरुरीनें हाताखालच्या लोकांशीं वागणार नाहीं.

साहेब : असं आज म्हणतां तुम्ही, पण तुमच्या हाताखालच्या लोकांना तसं उद्यां खास वाटणार नाहीं.

नरेन्द्र : मग मीं काय करावं असं आपलं म्हणणं आहे ?

साहेब : विचारलंत म्हणून सांगतों. आपल्या स्वभावाला मुरड घाला. सर्कशींतल्या सिंहाला मालकाच्या मर्जीप्रमाणं नाहीं का नाचावं लागत ? तो फार गुरगुरूं लागला, गर्जू लगला म्हणजे काय होतं ? चाबकाचे तडाखे खाऊन त्याला उपाशीं राहावं लागतं. जग हें असं आहे.

नरेन्द्र : खरं आहे आपलं म्हणणं.

साहेब : बरं, तुम्ही वेळच्या वेळीं ऑफिसांत येऊन वेळच्या वेळीं काम कराल ना?

नरेन्द्र : होय करीन. पण पगार वेळच्या वेळीं मिळेल ना?

साहेब : पाहिलंत? हें तुमचं नडतं तुम्हांला.

नरेन्द्र : म्हणजे काय? आपण कामासंबंधीं विचारलंत, तसं मीं पगारासंबंधीं विचारलं. माझा प्रश्न गैर आहे?

साहेब : प्रश्न अगदीं रास्त असला, तरी तो विचारणं मात्र अगदीं गैर आहे. अहो कोणत्याही वरिष्ठाला रुचायचं नाहीं हें, मिस्टर नरेन्द्र. फटकळ मनुष्य नेहमीं आपल्या भोंवतीं शत्रु निर्माण करीत असतो.

नरेन्द्र : पटतं आपलं म्हणणं मला.

साहेब : होय ना? मग मी तुम्हांला एक संधि देतों. एक महिना आम्ही तुमचं कामं पाहूं, वर्तन पाहूं, आणि दोन्ही पसंत पडल्यास तुम्हांला कायम करूं. आयुष्याला नवं वळण देणं आतां सर्वस्वीं तुमच्या हातीं आहे.

नरेन्द्र : अधिकारी चांगले वागल्यावर मी कशाला वाईट वागेन?

साहेब : झालं? आलांत पुन्हा मूळ स्वभावावर?

नरेन्द्र : चुकलं वाटतं?

साहेब : तुम्ही जरुरीपेक्षां एक शब्द न बोलतां इथं इतर लोक कसे वागतात तें बघा आणि त्याप्रमाणें वागायला शिका.

नरेन्द्र : बरं. आजपासूनच सुरुवात करूं?

साहेब : करा कीं. आमचे हेडक्लार्क तुम्हांला काम समजावून देतील.

नरेन्द्र : पण....प....प....

साहेब : पण काय? पगार होय? (हसून) पगार साठ रुपये मिळेल. कबूल आहे?

नरेन्द्र : आहे.

साहेब : गोंधळेकर!

गोंधळेकर : आलों. (जरा वेळानें येतात.)

साहेब : गोंधळेकर, ह्यांना आजपासून appoint केलं आहे. हा त्यांचा अर्ज. त्यांचं काम त्यांना समजावून द्या. नि हें बघा, ते नेभळे बाहेर बसले असतील, त्यांना जरा आंत पाठवा.

(गोंधळेकर व नरेन्द्र आंत जातात.)

(नेभळे प्रवेश करतो.)

साहेब : नेभळे, ऑफिसच्या कामाकरितां आम्ही दुसरा मनुष्य नेमला; पण तुमची परिस्थिति पाहून तुम्हांला हाफ् टाईम् ऑफिस-मध्यें व सकाळ संध्याकाळ माझ्या घरीं माझीं खाजगी कामें करण्याकरतां नेमण्याचा माझा विचार आहे. ऑफिसांतून दहा रुपये नि माझ्या खाजगी कामाबद्दल दोन वेळ जेवण तुम्हांला मिळेल. बोला, आहे कबूल?

नेभळे : साहेब! आपण साक्षात् दयाळु परमेश्वर आहांत!

साहेब : पुरे! नेभळे, तुम्ही आतां हा नेभळेपणा सोडून द्या आणि जरा तडफदार बना.

(गोंधळेकर व नरेन्द्र प्रवेश करतात.)

गोंधळेकर : साहेब, ह्या गृहस्थांचं आपल्या ऑफिसांत जमायचं नाहीं.

साहेब : काय झालं हो?

गोंधळेकर : त्यांना मीं शेल्फवरचं अकाउंट बुक खालीं काढायला सांगितलं, तर ते म्हणतात, 'तें माझं काम नाहीं, शिपायाचं आहे.'

साहेब : ठीक आहे. (उठून तडक आंत जातात. गोंधळेकर व नरेन्द्र कुतूहलानें एकमेकांकडे पाहातात. पांचदहा सेकंदांनीं साहेब हातांत अकाउंट बुक घेऊन प्रवेश कारितात.)

साहेब : हं, गोंधळेकर, हें घ्या अकाउंट बुक आणि काय हो, आज बाबुराव कुठं दिसत नाहीं.

गोंधळेकर : तो आजारी आहे साहेब.

साहेब : असं होय? (कोपऱ्यांतलें फडकें घेऊन टेबल साफ करूं लागतात.)

नरेंद्र : तें मी करतों. (त्यांच्या हातांतलें फडकें घेऊन त्यांचें टेबल साफ करतो.)

साहेब : तें काम शिपायाचं आहे, नरेंद्र.

नरेन्द्र : साहेब जर शिपाई होऊं शकतात, तर मला कां होतां येणार नाहीं शिपाई ? मी चुकलों.

साहेब : मग गोंधळेकरांशीं शेक हँड करा बरं. (नरेंद्र तसें करतो.) आतां भावंडांसारखे वागा.

नरेन्द्र : मी आपला फार आभारी आहें.

साहेब : (खुर्चीकडे बोट दाखवून) पण ही फार मगरूर आहे बरं.

नरेन्द्र : छे छे, तें सौजन्याचं सिंहासन आहे. (साहेब त्याच्याशीं हस्तांदोलन करतात. पडदा.)

म. मं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. २०७५ नों. दि. ....
वि. ...... क्र. ....

चार वेडे

(टीप : वेडे ह्या शब्दाचा अर्थ वाचकांनीं योग्य तोच करावा.)

[फळयावर एक कुंडली काढली आहे.
जवळ जोशी एकाग्रतेनें विचार करीत उभा आहे.]

कॉम्रेड : (प्रवेश करून) ह्या वर्गकलहाच्या झगड्यांत अखेर मजूर-किसानांचाच जय झाला पाहिजे.

जोशी : (आपल्याच तंद्रींत) शक्य नाहीं !

कॉम्रेड : काय शक्य नाहीं ?

जोशी : मी आज केस कापणें शक्य नाहीं.

कॉम्रेड : काय ? बरळतो आहेस काय हें ? शुद्धीवर ये जरा.

जोशी : अरे, बाबा म्हणाले, कीं केस फार वाढले आहेत, आत्तां जाऊन कापून ये.

कॉम्रेड : मग त्यांत शक्य काय नाहीं ?

जोशी : तुला समजायचं नाहीं तें. अरे केस आत्तांच कापावेत कीं नाहीं ह्याची मांडली आहे ही मीं कुंडली.

कॉम्रेड : शाबास रे होरारत्ना ! ह्याला म्हणावा शास्त्राचा व्यासंग. काय रे जोश्या, मी ऐकलं आहे, कीं तूं म्हणे शिंक आली, कीं एकदम प्रश्नकुंडली मांडतोस ! ग्रह जर अनुकूल असले, तर तिला बाहेर निसटूं देतोस आणि प्रतिकूल असले, तर तिला आंतल्या आंत कोंडून गिळून टाकतोस ! खरं का रे हें ? काय वेडा आहेस रे ! तुझं हें ज्योतिषशास्त्र म्हणजे निव्वळ humbug आहे बघ.

जोशी : ए मास्कोच्या लालडगल्या ! खबरदार, त्या गहन शास्त्राची निंदा करशील तर ! तुझे गुरु, चंद्र, बुध, शनि – राहू – मंगळानं दूषित

असलेच पाहिजेत, म्हणून बडबडतो आहेस असा. बघ एकदा त्या कुंडलीकड. लग्नसप्तमांतून मंगळ, हर्शल ऑपोझिशन्. डोक्यावर दशमकेंद्रांत वक्री शनि नि पंचमांतून राहू अष्टमांतल्या रविबुधचंद्राशीं कम्प्लीट स्क्वेअर करीत आहे.

कॉम्रेड : नि तुझ्या अकलेचं त्यांत सर्कल बनलं आहे.

जोशी : ऐकून तर घे. अशा भयंकर लग्नावर जर का मी हट्टानं बाबांचं ऐकून केस कापायला गेलों, तर माझं डोकं नक्की रक्तबंबाळ होईल.

कॉम्रेड : पण केसांबरोबर थोडेसे कानही कापले गेले, तर जरा माणसांत तरी येशील कीं.

जोशी : अशक्य! योगच आहे तसा भयंकर रक्तपाताचा.

बुवा : (प्रवेश करून व हातांतील जपमाळेचा मेरुमणि कपाळाला लावून) ॐ शांतिः शांतिः शांतिः. अहो, त्या शांतिमय परब्रह्मस्वरूपाचें चिंतन करण्याचें सोडून रक्तपातासारख्या अमंगल विषयाची काय चर्चा करीत बसलाहांत? काय म्हणावं तुम्हांला? नमः शिवाय. बा जोशा! अरे, तुझ्या त्या ज्योतिषानं तुला किती कमकुवत बनवला आहे रे! तुझ्या अंतःकरणांत जर ईश्वरभक्तीचं प्रचंड श्रद्धाबळ असतं, तर तूं असल्या भेकड बनवणाऱ्या शास्त्राला मुळींच बळी पडला नसतास. बाबा रे, प्रभूची कृपादृष्टि असेल, तर रक्ताचा एक थेंब देखील यायचा नाहीं बाहेर. उलट तें शस्त्रच बोथट होईल.

कॉम्रेड : कुठं? ह्याच्या डोक्यावर? अरे तिथं तर शनि बसला आहे वक्री होऊन. (जोश्याची टोपी काढून त्याची शेंडी दाखवितो.)

बुवा : पण कैलासनाथ श्रीशंकर त्या शनीचा बाप आहे, समजलास? शिवलीलामृत नाहीं वाटतं वाचलंस? बाबा रे, अंगीं पात्रता यायला अखंड नामस्मरणाची खडतर तपश्चर्या करावी लागते बरं! आणि त्यांतच खरा आनंद आहे....

ओक : (कान व डोकें मफलरनें बांधलेलें, पायांत मोजे व स्लिपर, कपाळावर सुंठीचा लेप, अंगांत स्वेटर, वर गरम कोट अशा वेषांत बगलेंतला

थर्मामिटर काढून त्याकडे पाहात प्रवेश करतो.) आनंद? अरे बुवा जगांत आनंदच नाहीं. आहे कुठें तो? नाना तऱ्हांच्या रोगांमुळें जगांत दुःख भरलं आहे.

कॉम्रेड : ए रड्या, तुला रे आतां रडायला काय झालं?

ओक : काय झालं नाहीं तें विचार. (खोकल्याची ढांस) अग आई ग. काय करूं रे? अरे चार वाजतां ९९ ताप होता, तो आतां ९९ पॉइंट दोन चढला मघाशीं. अर्ध्या तासापूर्वी नाडीचे ठोके ८२ पडत होते, ते आतां येतां येतां ८४ झाले. काय करावं समजत नाहीं. कित्ती डॉक्टर आणि कित्ती वैद्य झाले म्हणून सांगूं? आज सकाळीं तो बुधवारांतला नवा F. R. C. S. डॉक्टर म्हणाला, हा कांहीं साधा ताप नाहीं. म्हणे, तुम्ही मुंबईला जे बी. टी. करतां गेलां ते येतांना टी. बी. घेऊन आलांत. आतां विश्वास तरी कुणावर ठेवूं रे? अग आई ग!

बुवा : उमापति नीलकंठावर पूर्ण विश्वास ठेव. वत्सा ओका, असा निराश होऊं नकोस. ७२ रोगांवरचा एकच उत्कृष्ट उपाय मी सांगतों तुला. मी देतों त्या मंत्राचा अखंड जप दृढश्रद्धेनें, उत्कट भक्तीनें व एकाग्र मनानें कर. २१ दिवसांत तुला गुण आलाच पाहिजे.

ओक : २१ दिवस? अरे बुवा, पण तोंपर्यंत मी जिवंत तर राहिलों पाहिजे ना?

कॉम्रेड : अरे, मध्येंच मृत्यु आला, तर शंकराचे दूत विमान घेऊन येतील तुला न्यायला आणि मग तर तूं अक्षरशः कैलासवासी होशील.

ओक : माझ्या डोळ्यांपुढं काजवे चमकायला लागून आतांच यमाचे दूत दिसूं लागले आहेत.

जोशी : मग आतां मात्र नक्की.

ओक : काय बाबा नक्की?

जोशी : राहू तुझ्या रवीवरून भ्रमण करीत असून मृत्युस्थानांतील शनि तुझ्या लग्नेशाशीं कुयोग करीत असलाच पाहिजे.

ओक : अरे बापरे! म्हणजे मला मृत्यु येणार कीं काय रे?

कॉम्रेड : अरे, जोशी असल्यावर काय भितोस मृत्यूला ? तो सर्व ग्रह इकडचे तिकडे करून तुला पुन्हा जिवंत करील.

जोशी : अरे, ह्या चोळणेवाल्याचं काय ऐकतोस तूं ? मी सांगूं ? तूं इतक्यांत मरणं शक्य नाहीं. भाग्यांतल्या गुरूची तुझ्या तनुस्थानावर पंचम दृष्टि आहे सध्या. तुला सध्या शनि छळतो आहे झालं....

कॉम्रेड : पण त्यापेक्षां मालकवर्ग कामगारवर्गाला किती तरी पटींनीं जास्त छळत आहे, त्याचा विचार करा जरा. ओका, ह्या शनीचं डोकं वक्री झालं असून तें commonsense शीं complete opposition करीत आहे. त्याच्या भाग्यस्थानाची आणि बुद्धिस्थानाची त्याच्या लग्नावर शुभ दृष्टि आहे, म्हणजे ह्याचं लग्न झाल्यावर ह्याचं डोकं ताळ्यावर येईल ; आणि भाग्योदय होईल तिनं कान उपटले म्हणजे ! त्याच्या नादीं काय लागतोस ? तुला जर माझ्यासारखं खरोखर ठणठणीत व्हा्यचं असेल तर ऊठ, स्वतःच्या व कामगारांच्या life मध्यें interest घे. सोशियालिझम्चा अभ्यास कर....

जोशी : चोळणा घालून गांवभर बोडका हिंड. ठराविक वाक्यें पेरून दोन चार व्याख्यानें दे, कीं झालासच तूं त्या मवाल्यांचा झट्पट् पुढारी.

कॉम्रेड : ओका, माझं आत्तां टि. म. वि. मध्यें व्याख्यान आहे. तें ऐक एकदां, म्हणजे त्यांतलीं तत्त्वं तुला कळतील.

ओक : माफ कर बुवा, माझ्याच्यानं इथून हलवत नाहीं.

कॉम्रेड : मग इथंच सुरू करूं व्याख्यान ?

जोशी : (हात जोडून) माझे आई, माफ करा. नाहीं तर निदान आमच्या दोघांच्या प्रकृत्या चांगल्या आहेत, त्या एकाएकीं हींव येऊन बिघडायच्या आणि तुला लागलीच दुसरं व्याख्यान ह्या ओकावर नदीकांठीं द्यावं लागायचं.

कॉम्रेड : तें कांहीं नाहीं. मी तुला आतां घेऊन जाणारच माझ्याबरोबर. (ओकाचा हात धरून त्याला ओढतो.)

जोशी : (त्याचा दुसरा हात धरून त्याला ओढीत) पाहातों कसा घेऊन जातोस तो. त्याला काय मारायचा आहे ?

ओक : अरे, पण तुमच्या दोघांच्या भांडणांत माझे कां हाल करतां उगीच ? माझ्या तब्येतीचं झालं आहे असं हें तुणतुणं नि छातीचा झाला आहे डफ....

बुवा : वा ! मग महादेवाचं भजन करायला चांगलीच सोय झाली म्हणायची. शिवशंकरा ! गिरिजावरा !

ओक : थांब, माझ्या छातीचे ठोके जोरांत पडायला लागले रे बुवा.

कॉम्रेड : त्याच्या तालावर तुझं भजन चालूं दे. म्हणजे लय वाढून एकदम थांबेल तें.

बुवा : शांत हो. वत्सा ओका, मन शांत व सुप्रसन्न ठेव. श्रीशंकराचं चिंतन कर.

कॉम्रेड : म्हणजे त्याचं हें वाहन तुला क्षणांत त्याच्याकडे घेऊन जाईल.

बुवा : आपलं आत्मिक बल वाढव. पण तें शिवप्रभूच्या कृपेवांचून लाभणार नाहीं. शिवकृपा सद्गुरुकृपेवांचून अशक्य. उत्कट इच्छा असेल तर सद्गुरु धावत घरीं येईल आणि मग सर्व रोग पळून जातील.

ओक : केव्हां येईल रे तो गुरु ?

जोशी : अरे तो नुक़ताच मार्गी झाला आहे. चैत्र-वैशाखांत वृषभेंत उतरला, म्हणजे सगळे रोग पळून गेलेच पाहिजेत. थांब, तुझी रास...

ओक : वृषभ.

कॉम्रेड : वाटलंच मला.

जोशी : अरे वा ! मग ४३ घटका आणि ५२ पळांनीं तुला चंद्र नववा आहे. दोन दिवस उत्तम जातील. प्रवास सुखकर.

कॉम्रेड : धरून दवाखान्यापर्यंत.

जोशी : भागीदारींत फायदा होईल. सट्टा, लॉटरीस लाभदायक. सासरचीं माणसें प्रेमानें वागतील.

ओक : पोटांत सुरुंग उडूं लागले रे ! [पृष्ठ ५७

पंत : साहेब, आपण खरोखरी रामशास्त्री प्रभुणे आहांत, लहानपणीं पाणके होतां का हो ? [पृष्ठ ६३

ओक : कुणाच्या सासरचीं ?

कॉम्रेड : अरे, तुझ्या 'भविष्य' पत्नीच्या वर्तमान सासरचीं.

ओक : अरे, आतां सासरचीं माणसं म्हणजे आप्तेष्ट, मित्रमंडळी ; आणि मुख्य सांगायचं, म्हणजे तुझी प्रकृति उत्तम राहील. करूं नये तें करावंसं वाटणार नाहीं. थोडक्यांत, व्हायचं तें झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

ओक : (मोठ्यानें ओरडून) अग आई ग ! मेलों रे मेलों.

सर्वजण : काय रे झालं ?

ओक : पोटांत क ऽ ऽ ळ आली रे. अपेंडिसाइटिस रे हें. (खिशांतून तांबड्या औषधाची बाटली व ग्लास काढून) बुवा, मला ह्या डॉक्टर गोखल्यांच्या औषधाचा एक डोस दे चटकन्. जोश्या, गरम पाण्याची पिशवी तयार कर पोट शेकायला. कॉम्रेड, टॅक्सी घेऊन जा नि डॉ. भडकमकरांना घेऊन ये लवकर. बुवा, दे कीं रे डोस....

बुवा : (ग्लासांत भरपूर औषध ओतून) ओका, हें भोलानाथाचं तीर्थ आहे अशा भावनेनं घे. नमः शिवाय, नमः शिवाय, नमः शिवाय.

जोशी : ओका ! ह्यांत गुरुचंद्र–युतीचं मांगल्य भरलं आहे रे.

कॉम्रेड : मला तर त्या ग्लासांत लालबावट्याच्या तत्त्वाचें सत्त्व भरलेलं दिसत आहे. पी तें.

ओक : अरे, पण त्या लाल औषधानें एखादे वेळीं माझं Blood pressure तर नाहीं ना वाढणार ?

कॉम्रेड : कांहीं होत नाहीं. पी. (औषध पाजतात.)

ओक : पोटांत सुरुंग उडूं लागले रे. आतां काय करूं ?

बुवा : शिवनामाचा गजर सुरू कर प्रसन्न चित्तानं. बघ तुझ्या हृदयांत ब्रह्मानंदाचा लख्ख प्रकाश पडेल. मार्कंडेयाप्रमाणें तुझाही अपमृत्यु टळेल. ईश्वराची लीला अगाध आहे.

कॉम्रेड : कुठला आला हा ईश्वर नि परमेश्वर ! ओक, हे देव, दैव, भक्ति, धर्म ह्या साऱ्या दुबळ्या मनाच्या मानवांना गुंगी आणण्याकरितां भोंदू वैदूंनीं, ह्या बुवांनीं बनविलेल्या अफूच्या गोळ्या आहेत.

आपल्या स्वतंत्र बुद्धीचा उपयोग कर. ऊठ एकदम. आपण टॅक्सी करून माझ्या व्याख्यानाला जाऊं.

ओक : मरूं दे रे तुझं व्याख्यान. माझा चालला आहे प्राण नि हा आचरटासारखा उगीच बडबडतो आहे.

जोशी : उगीच त्रास करून घेऊं नकोस. हे बुद्धीचे दैत्य गेले, म्हणजे तुझा विकार पाहून काढतों प्रश्न कुंडली मांडून.

बुवा : दुर्दैवी जीवा, तुझ्या मुखांतून जर शंकराचं नांव येत नसेल, तर वाल्यासारखं सोपं रामनाम तरी घे.

ओक : तें बहुतेक आतां तुम्हांलाच घ्यावं लागणार आहे. माझ्या पोटांत कोण भडका उडाला आहे.

कॉम्रेड : शेतकऱ्यांच्या अन् मजुरांच्या पोटांतला भडका शमविण्याची खटपट कर, म्हणजे तुझा भडका शांत होईल. ओक, तुला अखेरचं सांगतों, तुला खरोखरीच कांहीं सुद्धां झालं नाहीं. तुझे सर्व रोग तुझ्या मनानंच उत्पन्न केले आहेत. बाहेर पड, जनसेवा कर, म्हणजे तुझं हें रोगाचं वेड ताबडतोब जाईल. मीं जातों. मला उशीर झाला. (जातो.)

बुवा : ओका, मलाही गेलं पाहिजे रे.

ओक : कुठं रे ?

बुवा : शिवमंदिरांत कीर्तनाला.

ओक : अन् तूंही चाललास का रे जोशी ?

जोशी : हो. ग्वाल्हेरचा एक पंडित आला आहे. त्याचं आतां व्याख्यान आहे भारतज्योतिर्मंडळामार्फत. मला तिथं गेलंच पाहिजे.

ओक : अरे, माझ्याकरतां एखादा टांगा तरी आणा!

दोघे : नि तूं कुठें जाणार आतां ?

ओक : ससून हॉस्पिटलपर्यंत चक्कर मारून येतों जरा.

(सर्व जातात.)

A Test Case

Judge : Clerk, where is the interpreter?

Clerk : At home, My Lord, he is sick.

Judge : Bad. Mr. Pinto, you stand for ?

Pinto : The complainant, My Lord.

Judge : And who is the Counsel for the accused ?

Dubash : I, My Lord, Mr. Fardunjee Kaikhushroo Jahangir, Pestonjee Dubash, resident of Navasari, B. A. honours of Calcutta University, LL. B. of Bombay, and am appearing for LL. M. of Madras in 1945.

Judge : Thank you for the information, Mr....who?

Dubash : Don't mention, My Lord. My name is Dubash.

Judge : Well, Mr. Dubash, who is your client?

Dubash : He is Mr. Pant (पंत) My Lord.

Judge : Can't you tell us his full name?

Dubash : Yes, I can, My Lord. (पंताकडे वळून) अरे पंता, तुमच्या अन् तुमच्या बापाच्या समदा नाम काय हाय ?

पंत : माझं नांव होय ? तसं खरं पाळण्यांतलं नांव आहे 'त्रिविक्रम'; पण सगळे हांक मारतात 'गोट्या'. मला आपलं तेंच आवडतं झालं. आतां वडिलांचं विचाराल, तर मी त्यांना म्हणतों बाबा. सर्व लोक त्यांना म्हणतात 'मामा'.

Judge : Is that all his full name, Mr. Dubash ?

Dubash : लई बात कशाला ? दोघांच्या नाम सांग.

पंत : दोघं कोण ? बाप लेक ना ?

Dubash : Yes; his full name, Mr. Lord, is Gotya Mama Pant.

Judge : Now Mr. Pinto, what is your case ?

Pinto : My Lord, I have the magnificent honour and great pride to hold this beautifully long brief of the benevolent Government of His Majesty King George VI of Great Brtiain and Ireland, and Emperor of India, Ceylon, and other colonies enjoying Dominion Status. And it is with indomitable sense of duty, loyalty and pertinacity that I do charge the accused most vehemently under sections 245, 453, 321 and 192A of the Indian Penal Code, his grievous crimes being that (I) whereas he was engaged by the complainant Seth Uttamchand Sapharchand Dhotia to officiate at the Shraddha ceremony of his grand–father, the said accused with culpable negligence recited mantras purporting to be as for the Shraddha of the complainant's most revered father Seth Sapharchnad Neemchand Dhotia, who is 92, still living, and hopes to reach his brilliant century with perfect confidence.

Judge : Have you finished ?

Pinto : A moment, my Lord. My second charge is that the said accused has wrongfully and wilfully deceived, cheated and defrauded my client to the extent of 4 annas, by unlawfully extracting from him, Rs. 2/– for his Daxina, whereas he was entitled, according to law, to Rs. 1-12-0 only. In short, My Lord...

Judge : We have understood your case, Mr. Pinto. Now, Mr. Dubash, explain to the accused, in short, the charges levelled against him.

Dubash : My Lord, will you please tell me a precis of the learned barrister's lecture in about one third its length ?

Judge : I am not appearing for the Matriculation Examination of the Bombay University.

Dubash : Very well, My Lord, अरे पंत, हा पिंटोसाहेब दारु प्याल्यावानी काय काय बोलला त्ये सम्दं समजला काय तुला ?

ते म्हनतो, कीं तुम्ही त्या शेटजीच्या घरीं जेवणाच्या वक्ताला अकराच लड्डू कशाला खाल्ला? डझन पुरा केम नाय केला? चक्रम हाय तूं.

पंत : मी चक्रम? मुळींच नाहीं. लाडू खातांना विक्रम करणारा त्रिविक्रम आहें मी. पण त्या दिवशीं असं झालं बरं का व्हिम्टोसाहेब, मला झाला होता आमांश, पोट दुखत होतं सारखं, म्हणून बारावा लाडू गेला नसेल. रागावूं नका म्हणावं शेठजींना, पुढच्या वेळेस त्याची चांगली कसर काढतों.

Judge : What does he say, Mr. Dubash?

Dubash : He says, my Lord, that according to the 45th verse of the Manusmriti Shastradhara, a Shraddha ceremony of a living person may be impatiently performed eight years before his actual death, and that, in as much as the fees for such an anticipatory Shraddha is 4 annas in excess of an ordinary one, he was quite within his legal limits in insisting on Rs. 2/—which is the legal minimum. For reference I draw the attention of Your Lordship to 592 Madras Law Reporter Case No. 623 of 1883 and also to the Privy Council Judgement of August 1875 in the case of King Emperor vs, Haigrivacharya Tungatobracharya.

Judge : Mr. Dubash, would you like to cross-examine the complainant?

Pinto : The complainant is not present in the court, My Lord. He has gone to Delhi on business, and will be back by to-morrow. I, therefore, pray for an adjournment.

Judge : No, I can't give you any adjournment. I must give my judgement ex-parte. Before I do so, would you like to cross-examine the accused?

Dubash : An accused can never be cross-examined, My Lord. That's a fundamental rule of law.

Judge : Mr. Dubash, the most fundamental rule is 'In the court of law, the Judge is the law.' So I call upon Mr. Pinto to cross-examine the accused.

Pinto : Very well, My Lord. Mr. Pant, on the 13th of July 1943, when my client Seth Uttamchand Sapharchand

Dhotia, millowner and millionaire of Gudria in Navsari District had engaged your services on explicit understanding that you were to officilate at the most auspicious Shraddha cermony of his grand father, Late Seth motichand Hirachand Dhotia, the ex-president of the Gudhria Municipality and Chairman of Local School-Board, did you, or did you not accept willingly and conscientiously the above-mentioned offer of the complainant the Seth Saheb, and...

Dubash : Is Mr. Pinto going to finish sentence when his client returns from Delhi ?

Pinto : My Lord, this is a mischievous interruption.

Dubash : My Lord, we dive with Mr. Pinto in the Atlantic Ocean, and when we rise up half dead, we find ourselves in the Pacific.

Judge : You must learn to hold your breath a little longer.

Pinto : Where were we ?

Dubash : In the African Jungle.

Pinto : Motherland ? Well Mr. Pant, and if you did so, did you or did you not, recite the Mantras, purporting to be as for the Shraddha of his most revered living father ?

Dubash : Not the dead one ?

Pinto : That's your province again. And if you did so, Mr. Pant, with what deliberate purpose or malicious motive were you prompted to act thus so unprofessionally and maligantly ? Now Mr. Pant, give me a straight answer to this plain and simple question.

Judge : Well, Mr. Dubash, what is your client's answer to Barrister Pinto's question ?

Dubash : Give my client some time, My Lord, to recover from the suffocation. I am sorry he did not use the gas-mask.

Pinto : Poor man ! He should have selected a more sensible counsel, My Lord,

Dubash : Yes. He should have selected a lunatic for the match. अरे मिष्टर पंत, हा यडा पिंटोसाब तुमाला इच्यारतो, कीं तुमची शादी झाली कीं नाय ? तुमाला पोरगा किती अन् पोरगी किती हाय ?

पंत : वा ! व्हिम्टोसाहेब, काय गरिबाची चेष्टा करतां राव ? अहो आमची गरिबाची कसली आली आहे शादी ? आम्ही आपल्या जन्मभर दुसऱ्यांच्या शाद्यांच्या याद्या करायच्या. अहो, स्वत:चंच पोट भरण्याची मारामार. लोकांनीं देव–धर्म सारा सोडला. महिन्यांतन १५ दिवस सुद्धां जेवण बाहेर निघत नाहीं नि लढाईमुळें आम्हीं जरा आमचे दर वाढवले, कीं हे लक्ष्मीपुत्र भिकारचंद आमच्यावर फिर्यादी करतात. काय करायचं बरं आम्हीं ? आणि तुम्ही विचारतां, शादी झाली का ? आतां तुम्हीच तुमच्या गांवीं तुमच्या अशिलांपैकीं भारद्वाज गोत्राशीं जुळणारी, कोणत्याही पोटजातींतली, एखाद्या श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी असेल तर पाहा. माझी प्रॅक्टिस तशी चांगली चालली आहे. आजन्म सक्तीच्या कष्टमय ब्रह्मचर्यजीवनांतून करा एकदां गरिबाची सुटका.

Pinto : What does he say, Mr. Dubash ?

Dubash : His straight answer to your simple question is, he *did not*.

Pinto : Did not what ?

Dubash : Did not do anything wilfully, wrongfully unjustly or unlawfully. To be brief, he did nothing that he should not have done.

Pinto : Is not that a foolish and absurd answer, My Lord ?

Dubash : And is it not an answer, quite befitting the question, My Lord ?

Judge : Of course, it is. Have you any witness, Mr. Pinto ?

Pinto : All the members of my client's family.

Judge : And you, Mr. Dubash ?

Dubash : All the members of my client's profession.

Pinto : But they were not present when the crime was perpetrated.

Dubash : What does it matter ? As if your witnesses were really present.

Pinto : This is a serious allegation.

Dubash : Perhaps. But not a false one.

Judge : Since you are quarrelling, I won't call in any witnesses. Mr. Dubash, I acquit the accused of the first charge. Now, ask him whether he charged the plaintiff Rs. 2- in good faith.

Dubash : पंता, हा जज्जसाब म्हनतो, कीं तुमी मला पांच रुपया कमती दिला. और पांच रुपया देईल तर ते तुमाला सोडून देईल. बोल, देईल का पांच रुपया ?

पंत : पांच रुपये ? आतांच कुठून बरं देऊं जज्जसाहेब ? हप्त्यांनीं दिले तर नाहीं का चालणार ? अगदीं निश्चित, खात्रीपूर्वक देईन. आतां कनवटीला एक पावली आणि एक सुपारी आहे, तेवढी देतों पाहिजे तर.

Judge : What does he say ?

Dubash : He says, he took the Daxina in perfectly good, blind and religious faith and consequently discovered a counterfeit four anna piece in the money. Hence your Lordship will realize that it is really my client who has been wronged, deceived, cheated and defrauded to the extent of four annas. So I plead that he is absolutely innocent, and suggest that the complainant be prosecuted for malicious prosecution.

Pinto : My Lord, this is quite irrelevant.

Dubash : See the guilty conscience, My Lord ; always frightened by the relevant rod of law and justice.

Judge : Both of you are partly right and partly wrong, and much can be said on both the sides. So I give the benefit of doubt to the accused, and acquit him of both the charges for want of convincing evidnce and uniformity between the two Counsels. As the complainant is a millionaire, he should bear the costs of both the sides.

Dubash : पंता, अरे मला इनाम दे. तूं सुटला. मीं सांगितला म्हणून जजसाबानं सोडला तुला.

पंत : (उडी मारून टाळ्या वाजवीत) मी सुटलों ? खरं का हो जजसाहेब ? हा घ्या माझा पहिला हप्ता. (जज्जाला पावली व सुपारी देतो.)

Judge : What is he doing, Mr. Dubash ? Is he mad or drunk ? Drive him away.

पंत : साहेब, आपण खरोखर रामशास्त्री प्रभुणे आहांत. पण लहानपणीं आपण पाणके होतां का हो ? (पडदा)

काकांचा चहा

[वसंत, अरुण आणि अशोक पांच-तीन-दोन खेळत बसले आहेत.]

अशोक : हुकूम बोल वसंता.

वसंत : ए तूं पानं लावलीं आहेस वाटतं ! हे बघ सारे सत्ते नि अठ्ठे; आमचं आपलं नववं पान फुटेल तो हुकूम.

अशोक : (त्याचें नववें पान उलटें करून) इस्पिक आला.

वसंत : पण आमचा बदाम हुकूम.

अशोक : ए, असला शिष्टपणा नाहीं हं चालायचा. तूं जर असं करणार असशील तर आम्ही खेळत नाहीं.

वसंत : बरं, इस्पिक तर इस्पिक, जा. चिडतोस काय असा मुलीसारखा ? (मुलें खेळूं लागतात; इतक्यांत दारावर थाप ऐकूं येते.)

वसंत : आतां कोण आलाय् रे मरायला इथं !

अरुण : कोण आहे ?

आंतून आवाज : मी आहें.

अशोक : अहो मी ! पण तुमचं नांव सांगा कीं....

आंतून आवाज : दार उघड आधीं.

वसंत : दम देतो आहे कीं रे हा प्राणी.

अशोक : दार उघडूंच नको या रे आपण, त्यानें नांव सांगितल्यावांचून.

वसंत : बस, असंच करूं या. आपण आपला खेळ चालू ठेवूं या. बसूं दे लेकाला कोकलत.

(मुलें खेळूं लागतात. दार जोरानें ठोठावलें जातें. तरी मुलें गप्.)

आंतून रागानें आवाज : वसंता, अरुणा, ऐकूं येत नाहीं का रे लेको तुम्हांला ? उघडतां कीं नाहीं दार ?

अरुण : आं ! वसंता, अरुणा ! ओळखीचा दिसतोय् रे कुणी.

वसंत : असूं दे. आधीं नांव.

अशोक : नांव सांगितल्याशिवाय मुळीं आमचं दारच नाहीं हो उघडत. जादूचं दार आहे तें.

आंतून संतापाचा आवाज : काय रे, तुमचा बाप नाहीं वाटतं घरीं ?

वसंत : बाप ? अहो शिष्ट, वडील म्हणा कीं, बाप काय म्हणतां ?

अरुण : अरे, हा कुणी तरी आडमुठ्या खेडवळ दिसतोय्. अवं पावणं ! लइ खट्‌कट् कशाला उगाच करतां ? तुम्हांला नांव आहे ना ? तें माहीत आहे ना ? मग सांगूनशान टाका कीं.

आंतून चिडका आवाज : काय डांबिस आहांत रे तुम्ही पोरं. माझं नांव पाहिजे काय तुम्हांला ? माझं नांव श्रीधर गोविंद टिल्लू. तुमचा काका. समजलं का आतां ?

(मुलें चपापतात. एकमेकांकडे पाहूं लागतात.)

अरुण : अरे बापरे ! ही ह्या चक्रम टिल्लूकाकांची ब्याद कशाला आली आहे इथं आतां ?

वसंत : अरे, हे मानलेले काका. बाबांचे म्हणे बालमित्र. बाबांनाही मोठी कटकट होते त्यांची. आपण आज त्यांची जरा गम्मत करूं या. अशोक, दार उघड तूं.

अशोक : मी नाहीं उघडत. तूंच उघड तें.

वसंत : अरे घाबरतोस काय त्यांना इतका ? खातात कीं काय ते ? मी उघडतों. (वसंत आंत जाऊन दार उघडून परत येतो. काका - डोक्याला सैलसा रुमाल, अंगांत लांब जुना कोट, खांद्यावर उपरणें, हातांत काठी अशा थाटांत प्रवेश करतात.)

काका : काय रे गाढवांनो, पटली कीं नाहीं अजून ओळख ? अरे, बापाला बाप न म्हणणारीं तुम्ही आज कालचीं फाजील कार्टीं

आपल्या काकाला कसचीं ओळखतां! अन् काय रे, आत्तां फाजिलपणा कोण रे करत होता?

वसंत : खरं सांगायचं, म्हणजे आम्ही सगळेच. अहो, तुमचा आवाज आम्हीं मुळीं ओळखलाच नाहीं हो काका. आज किती तरी दिवसांनीं आलांत तुम्ही! पण खरंच, तुमच्या आवाजांत पुष्कळच बदल झाला आहे. नाहीं रे अरुण?

अरुण : तर रे. अन् काका, तुम्ही आलेले आम्हांला ठाऊक असतं तर आम्ही दार उघडल्याशिवाय राहिलों असतों का?

काका : तुमचा काय नेम सांगावा! अरे, तुम्ही एखादे वेळीं आपल्या बापाला सुद्धा घरांत येऊं द्यायचे नाहींत. अन् काय रे, घरांत तुमचे आईबाप कुठें दिसत नाहींत. सिनेमाला गेलेत काय दोघंजण तुम्हांला घरांत धुडगूस घालायला ठेवून?

वसंत : बाबा गेले आहेत नाटकाला आणि आई गेली आहे सिनेमाला.

काका : अन् तुम्हांला नाहीं का पाठवलं एखाद्या सर्कशीला?

अशोक : पण आतां इथं सर्कस आहेच कुठं मुळीं?

वसंत : बाबा म्हणाले, घरींच सर्कस पहा तुम्ही.

काका : म्हणजे तुम्ही आत्तां सर्कस करत होतां होय?

अशोक : कशी करायची सर्कस सांगतां काका?

काका : हो! थांबा तुमच्याकडून करवूनच घेतों. तुमच्यापैकीं चहा कोण करतो रे चांगला? (किंचित हसून) हें पाहा मुलांनो, आज मी तुमचा काका पुष्कळ दिवसांनीं आलों आहें ना तुमच्या घरीं? मग सुंदरसा चहा करा पाहूं. काय रे वसंत, करतोस का?

वसंत : आपण जन्मांत कधीं केला नाहीं चहा.

काका : चोरा! अन् तूं रे अरुण?

अरुण : मलाही येत नाहीं चहा करायला.

काका : मग काय शंख करायला येतो का ? हट्ट् लेको. नालायक पोरं ! चहा सुद्धा करतां येत नाहीं बेट्यांना. मग हॉटेल कसं चालवाल ?

वसंत : अरुण, काका कधीं अनुभवाशिवाय बोलायचे नाहींत हं !

काका : अरे हो, हो. तूं काय समजला आहेस ? बघ कसा झकास करतों तो. चहा करायला कांहीं लंडनूला नाहीं जावं लागत. अशोका, बाळा तूं स्टो आण पाहूं इथंच; अरुणा, तूं वरुण होऊन एका भांड्यांत तीन कप पाणी घालून आण बघूं; आणि वसंता, तूं चहा साखरेचे डबे आण रे. सर्कस करायची ना ? अरे पळा. बघत काय उभे राहिलांत असे माझ्याकडे अजागळासारखे. चला, पटापट कामं करा. असा झकास चहा बनवतों, कीं यंव्. भागो, भागो जलदी....
(मुलांना आंत पिटाळतात. त्यांची वाट पाहात येरझाऱ्या घालतात. ७–८ सेकंदांनीं अशोक स्टो घेऊन हसत येतो व त्यांच्यापुढें ठेवतो.)

काका : आणि स्पिरिट् रे ?

वसंत : आई तसाच पंप करून पेटवते नेहमीं.

काका : अशानेंच बिघडतात ते स्टो. मीही पेटवतों झालं तसाच. अरे पण काड्यांची पेटी कुठं आहे ? घेऊन ये बाळा तेवढी, तोंपर्यंत मी पंप करतों. हं.

(अशोक आंत जाऊं लागतो; विंगजवळ वसंत त्याच्या कानांत कुजबुजतो. नंतर एक डबा व एक पुडा घेऊन प्रवेश करतो. काका पंप सपाटून करतात तरी तेल येत नाहीं. चिडतात.)

काका : निपलमध्यें खंडीभर काजळ साचलं असेल झालं. काय गबाळीं रे तुम्ही सारीं माणसं ! इतका पंप केला तरी तेल येत नाहीं.

वसंत : अहो काका, ती चावी अगोदर बंद केलीत का तुम्हीं ?

काका : अर्र्र् ! खरंच कीं रे. उघडीच राहिली बरं का रे. (चावी घट्ट बंद करून) आतां बघ कसा पेटवतों तो. (पुन्हा पंप करतात, तरीही तेल येत नाहीं.) अरे झालं तरी काय तुमच्या स्टोला ?

अरुण : (चहाचें पातेलें घेऊन येतो.) अहो काका ! तो स्टो हलवून पाहा बरं जरा, त्याच्यांत तेल आहे कीं नाहीं तें.

काका : (स्टो व नकारार्थी मान दोन्ही एकदम जोरानें हलवून) हात रे तुमची सासू कांदे खाई ! स्टोमधें तेल सुद्धा नाहीं. अन् हसत उभा काय राहिला आहेस बावळटासारखा ! जा आंतून चटकन् राकेलची बाटली घेऊन ये. अन् भरून आण हं, नाहीं तर रिकामी आणायचास ! हो ! !

अरुण : कसं हो ओळखलंत काका ? खरोखर बाटली रिकामी आहे. आजच सकाळीं आई म्हणत होती तेल संपलंय् म्हणून.

काका : सगळी बोंबाबोंब आहे झालं ! हं, हे घे चार पैसे अन् जा घेऊन ये दुकानांतनं तेल चटकन्.

अरुण : बाटलीला दहा पैसे पडतात, काका.

काका : अरे जा रे. चार पैशांचं मिळेल तितकं घेऊन ये. जरा झट्झट् कामं करा म्हंजे पाहा कसा झकास चहा बनवतों तो.

अरुण : मग तसं चार पैशांइतकं असेल थोडंसं बाटलींत शिल्लक.

काका : फाजिलपणा करतोस होय रे ? जा आण जा तें आंतून अन् ते चार पैसे दे इकडे. (तो देत नाहीं. काका त्याच्या हातांतून हिसकावून घेतात व त्याला थप्पड मारून आंत ढकलतात.)

अशोक : (प्रवेश करून) काका, सबंध घर धुंडाळलं, पण काड्यांची पेटी कांहीं कुठें सापडत नाहीं.

काका : मग रडा ! ॲहॅहॅहॅ ! काय पण घरांत व्यवस्था ! काय मुलं ! इतका गबाळेपणा मीं नव्हता बुवा पाहिला कुठं.

अशोक : तुमच्या खिशांत असेल तर बघा.

काका : काय ?

अशोक : काड्यांची पेटी हो !

काका : आतां माझ्या खिशांतली मी काढतोंच रे; पण तुमच्या घरांतली गम्मत पाहिली. (खिशांतली पेटी काढून) अरे हा अन्या कुठं

ब्रह्मदेशांत गेला कीं काय तेल आणायला ! ती पाहा ती तिथें समोर बाटली दिसते आहे तेलाची. मीच आणतों झालं. (गडबडीनें जाऊन ती आणतात व स्टोची फिरकी फिरवून उघडतात व ओतूं लागतात.) अरे हें रे काय ? वास कसला येतो ह्याला ?

अरुण : (बाटलीसह प्रवेश करून) अहो ती फिनायल्ची बाटली आहे, काका.

काका : संशय आलाच मला. म्हटलं, असं कां दिसतंय् हें तेल. वश्या, हें ओत पाहूं परत त्या बाटलींत ; अन् अऱ्या किती रे वेळ लावलास लेका ? भर आतां तें स्टोमध्यें लवकर.

(मुलें त्रासतात.)

वसंत : आम्हांला कंटाळा आला बुवा काका, तुमच्या ह्या ' हें करा अन् तें करा ' चा. राहूं द्या झालं तुमचा तो चहा.

काका : तूं जरा जास्त फाजील शहाणा दिसतोस बरं का, वश्या. कंटाळा आला म्हणे. ओत मुकाट्यानं तें फिनाइल परत त्या बाटलींत अन् तूं भर रे चटकन् त्यांत तेल ; बघा कसा चहा झकास करतों तो. आटपा लवकर. (मुलांना म्हटल्याप्रमाणें करावयास लावतात. स्टोची फिरकी व चावी घट्ट बसवतात, इतक्यांत अशोक आंतून स्पिरिटची बाटली आणतो.)

अशोक : काका हें घ्या स्पिरिट, सापडलं.

काका : शाबास रे माझ्या पठ्या वाघा.

(काका स्टो पेटवतात व त्यावर पातेलें ठेवतात)

काका : साखर कुठं आहे रे ?

वसंत : त्या पुड्यांत काका. चहाची साखर आई फडताळांत ठेवते, म्हणून पिठी साखर आणली. आजच सकाळीं पुडा आणला होता.

काका : वा ! पिठी साखर तर उत्तमच. (साखर भांड्यांत ओततात)

वसंत : चमचा होता कीं तिथं.

काका : चमचा तुम्हांला लागायचा रे. आमचं आपलं अंदाजी

काम. पण अंदाज चुकायचा नाहीं हं कधीं. बरं आतां चहा. (डबा उघडतात.) अरे हें रे काय वश्या? ही शिकेकाई रे कशाला?

अरुण : घाला काका तीच झालं. पाहूं तर खरं शिकेकाई–टी कसा बनतो तो.

वसंत : म्हणजे ह्या नव्या पेयावर मात्र सुंदर हॉटेल चालेल काकांचं.

काका : पाचकळपणा किती कराल रे! आत्तां आधण येईल. जा, वसंता, हा डबा ठेवून देऊन चहाचा डबा घेऊन ये.

वसंत : काका, आतां मात्र मी स्पष्ट सांगतों, कीं चहाचा डबा मला कांहीं कुठं सापडायचा नाहीं.

काका : (रागानें खिशांतून पैसे काढून) हं. हे घे दोन पैसे. दुकानांतून घेऊन ये जा चांगला चहा. धाव.

अरुण : दोन पैशांचा ऑरेंज पीको आण रे.

अशोक : नाहीं तर गोटाकंबे....

वसंत : अरे लिप्टन्चा खोकाच आणतों सबंध. (जातो.)

काका : आतां दूऽऽध....

अरुण : आईनं विरज्...लं...

काका : म्हणजे? दुपारच्या चहाकरतांही नाहीं ठेवलं थोडंसं? (अरुण नकारार्थी मान हालवतो.)

काका : मग तूं असं कर. घरांतन एक पेला घे, अन् शेजारच्यांकडून उसनं आण पेला भरून. म्हणावं, 'काका आले आहेत. त्यांच्याकरतां चहा करायचा आहे. आमचं संध्याकाळीं आलं, म्हणजे तुमचं परत करूं?' जा धाव.

अरुण : आपल्याला अशी भीक मागायची लाज वाटते बुवा.

काका : भीक रे त्यांत कसली मागायची आहे, मूर्खा? त्यांचं परत करावं म्हणजे झालं. (अरुण नकारार्थी मान हालवतो.) अशोक, तूं शाहाणा आहेस बाळा, तुला चांगला झकास चहा पाहिजे ना? मग आणतोस?

अशोक : आणतों. (आंतून पेला घेऊन येतो व दुसऱ्या विंगनें आंत जातो.)

काका : तुम्ही आतां आंतून कप बशा तरी आणतां का ? (अरुण आंत जातो. वसंत प्रवेश करतो.)

वसंत : हं, हा तुमचा दोन पैशांचा झकास चहा.

काका : शाबास रे माझ्या वीरा ! पाहा तर खरा कसा झकास चहा होतोय् तो. (पुडी सोडून सगळा चहा भांड्यांत ओततात.)

वसंत : अहो काका ! तुमच्या चहाच्या पाण्याला आधण नाहीं वाटतं यावं लागत ?

काका : तूं गप्प बैस जरा. चहा प्याल्यानंतर मग बोल. तुला समजायचं नाहीं त्याचं तंत्र.

वसंत : किर्लोस्कर मासिकांत छापत कां हो नाहीं ?

काका : छापूं हं आतां. अरे, पण हें भांडं आतां खालीं कशानें उतरायचं ? चिमटा घेऊन ये कीं....

वसंत : चिमटा बिमटा सापडेपर्यंत चहाचं एग्युमिक्श्चर व्हायचं. उतरा झालं तुमच्या उपरण्यानं (काका रागानें आपल्या उपरण्यानें भांडें खालीं उतरतात.)

काका : आतां ह्याच्यावर ठेवायला एखादी झाकणीविकणी तरी आहे का ? का ठेवूं माझा डोकीचा रुमाल काढून ?

वसंत : नका काका, नका. चहाला निराळाच स्वाद यायचा. आणतों मी झांकणी. (आंतून एक झांकणी आणून भांड्यावर ठेवतो. अरुण कपबशा व गाळण्यासह प्रवेश करतो.)

काका : शाबास, शाबास. आतां बसा जरा. अरे, पण अशोक आला का पाहा रे दूध घेऊन....

अशोक : (प्रवेश करून) हा आलों पहा.

काका : शंभरावर पांच आहेत बघ तुला. आणलंस दूध ? (अशोक पेला दाखवतो) झक्क ! पण दूध तापवायला भांडं रे वसंता ?

वसंत : दुसरं भांडं काय करायचं ? ओता झालं तें दूध चहाच्याच भांड्यांत नि ठेवा तें स्टोवर जरासं.

काका : असं म्हणतोस ? बरं बघूं. आण तो पेला, अशोक.

(अशोक काकांना पेला देतो. काका त्यांत पाहातात.)

काका : अरे हें रे काय ?

वसंत : काय झालं काका ?

(काका पेल्यांतून दुधानें भरलेली एक नैवेद्याची वाटी बाहेर काढून सर्वांना दाखवितात.)

अशोक : अहो काका, त्या शेजारच्या वहिनी म्हणाल्या, ' पेलाभर दूध कांहीं नाहीं शिल्लक. ती देवांपुढें नैवेद्याची वाटी आहे ती घेऊन जा पाहिजे तर. '

काका : आतां काय करायचं ?

वसंत : तें दूध चहाच्या भांड्यांत ओतायचं.

काका : असंच केलं पाहिजे मग आतां. (दूध भांड्यांत ओततात.)

अरुण : काका, आतां तो स्टो विझवायला हरकत नाहीं ना ?

काका : अरे खरंच कीं. (स्टो विझवतात) करा रे कप पुढें. झालाच चहा.

(मुलें हसूं दाबत कप पुढें करतात)

काका : हसायला रे काय झालं ?

वसंत : कांहीं नाहीं. झकास चहा प्यायला मिळणार ह्याचा आनंद होतो आहे आम्हांला.

काका : (चहा गाळतात.) प्या रे आतां, बघा कसा काय झालाय तो.

वसंत : (पहिल्याप्रथम घोट घेतल्यासारखें करून) वा ! वा ! वा ! काय पण झकास चहा झाला आहे ! जरा थोडासा जास्त गोड झाला आहे. नाहीं रे अरुण, अशोक ? (डोळे मिचकावून त्यांना खूण करतो)

अरुण : (किंचित् चव घेऊन) खरंच कीं रे. झकास म्हणजे झकासच झाला आहे. पण जरा साखर जास्त पडली का हो काका ?

काका : (घोट घेऊन व तोंड किंचित् वाकडें करून) होय, झालाय् खरा जरा गोड, पण बरा झाला आहे.

मुलांचे वडील (प्रवेश करत) : ओ हो हो ! श्रीधर ! केव्हां रे आलास ?

अशोक : बाबा, काकांनीं चहा पाहा कसा झकास केला आहे तो. (त्यांना आपला पेला देतो.)

वडील : (पेल्यांतील चहाकडे पाहून) हें काय रे ? हा चहा ? (थोडा पिऊन तोंड अत्यंत वाईट करतात.) अरे राम, राम, राम, राम ! हा रे कसला चहा ? नि हा असा खारट रे कसा ?

काका : (संतापानें वसंताकडे बोट करून) ह्या तुझ्या हरामखोर कार्ट्याला विचार.

वसंत : मीं काय केलं ? बाबा, मी त्यांना पिठीसाखरेचा म्हणून पुडा आणून दिला. तो होता वाटतं सोलर सॉल्टचा. मला काय माहीत ?

(वडील मोठ्यानें हसतात. मुलेंही हसतात. काका फार संतापतात.)

वसंत : तरी पणए कंदरींत चहा कसा झाला आहे रे अरुण-अशोक ?

अरुण-अशोक : (ओरडतात.) झकास.

काका : गाढवांनो ! (काठी उगारून त्यांना मारायला धावतात. मुलें आंत पळून जातात, काका त्यांच्या मागें धावतात. मुलांचे वडील 'अरे श्रीधर' म्हणत त्यांच्या मागोमाग आंत जातात. मुलांचा आंतून आवाज ऐकूं येतो 'झकास.' पडदा.)

शंकर भोळे

(कृष्णा व्यवहारेची खोली. त्याचा धाकटा भाऊ माधव भोवरा फिरवीत आहे.)

(आंतून आवाज) कृष्णा, ए कृष्णा.

माधव : कृष्णा नाहीं घरांत. बाहेर गेला. कोण आहे ?

कंटक व फणसे : (प्रवेश करून) बाहेर गेला ? केव्हां येईल रे ?

माधव : येईल आत्तां पांच दहा मिनिटांत. (जातो.)

भीमा फणसे : मध्या, कोटाला फूलबील लावून ऐट तर खूपच केली आहेस. आम्हांला दे कीं एखादं असलं फूल.

मधु कंटक : हेंच घे कीं. खूप फुलं आहेत असलीं आमच्या बागेंत. (फणसेला फूल देतो.)

फणसे : हा ! तुझ्या गुलाबाचा कांटा बोचला कीं रे कंटक. कांटे सुद्धा काढले नाहींस ना त्याचे ?

कंटक : शिष्ट आहांत झालं. कधीं लावलं होतं का फूल जन्मांत ? एवढं कोटाचं काढून दिलं तें गेलं कुणीकडच नि नुसता दोष मात्र काढतो आहेस. काय रे, तुला कधीं कांहीं आपल्याजवळचं दुसऱ्याला दिलेलं आठवतं का ?

फणसे : हो, न द्यायला काय झालं ? हें घे. माझ्याकडे आहे तें मी तुला देतों. हें घे एक केळं खिशांत राहिलं होतं तें. (केळं देतो.)

कंटक : काय पण केळं ! रस्त्यांत पडलेलं उचललंस वाटतं ? त्याचं साल पाहा. सारं काळं, डागळलेलं....

फणसे : हं, मध्या, अगोदर नांवं ठेवूं नकोस हं. अरे बाबा, बाहेरून

अशीं काळीं दिसणारीं केळीं आंतून हटकून जास्त गोड असतात. बरं पाहा तर आधीं खाऊन.

कंटक : खरं आहे बुवा मिम्या तुझं म्हणणं. गोड आहे चांगलं. (पावलांचा आवाज होतो.) आला वाटतं कृष्णा. अरे ! हा शंकऱ्या भोळे कशाला आला आहे इकड ?

शंकर भोळे : (प्रवेश करून) ओ हो ! फणसे–कंटक, व्यवहारे आहे का रे घरांत ?

फणसे : इथं दिसतो आहे का कुठं ? आंत असला तर पाहून ये जा.

कंटक : पण सरळ बोल कीं जरा. भोळे, तो बाहेर गेला आहे रे. नि आम्ही त्याचीच वाट पाहात बसलों आहोंत.

फणसे : पण काय रे, काय एवढं काम पडलं आहे त्याच्याशीं ?

भोळे : सांगूं ? तूंच करशील माझं काम ? उपकार होतील तुझे मोठे माझ्यावर.

फणसे : आपण नसतों बुवा करीत कधीं कुणावर उपकार बिपकार.

कंटक : काय तिरसट आहेत रे मिम्या ! भोळे, मला सांग तुझं काम, मी नक्की करीन. वेळेवर उपयोगीं पडणार नाहीं, तो मित्र कसला ?

फणसे : (टाळी वाजवून) शाबास रे वाक्पंडिता. टाळीचं वाक्य बोललास अगदीं.

कंटक : फाजिलपणा काय करतो आहेस उगीच ? भोळे, तुझा माझ्यावर विश्वास असेल तर सांग.

भोळे : सांगूं ? पण कुणापाशीं बोलूं नकोस हं.

कंटक : भलतंच कांहीं तरी ! माझ्या तोंडांतून कोणतीही गुप्त गोष्ट कधीं बाहेर पडली आहे का ?

फणसे : किंवा पडली तरी तुला समजली आहे का ?

भोळे : तसा नाहीं तो. सांगतों ऐक. हें बघ, दादाचं असं पत्र आलं आहे, कीं कमळी टायफॉइडनें आजारी आहे म्हणून. तेव्हां

आईला मुंबईला ताबडतोब गेलंच पाहिजे. पण....भाड्याला पैसे नाहींत रे आमच्यापाशीं....

कंटक : अस्सं होय ? किती लागतील ?

फणसे : शुद्धीवर आहेस ना मध्या ?

कंटक : हो, अगदीं चांगला शुद्धीवर आहें. तूं उगीच बडबड करूं नकोस मध्यें. नि काय रे, अडचणींत असलेल्या माणसाबद्दल सहानुभूति जी कांहीं म्हणतात, तिचा लवलेश तरी आहे का रे तुझ्या अंतःकरणांत ?

फणसे : माझी आपली राहूं दे रे, पण आपल्या अंतःकरणांत जी इतकी सहानुभूति उचंबळून आली आहे ती खिशांतून बाहेर पडणार आहे का ? कीं तिची वाफ नुसती मुखावाटे निसटणार ?

कंटक : खिशांत आत्तां कांहीं नसलं म्हणून काय झालं ? वाटेल त्या क्षणाला तो मागेल तितके पैसे मी त्याला त्याच्या घरीं नेऊन देईन, समजलास ? शब्द म्हणजे शब्द. एकदा मित्र म्हटला म्हणजे मी त्याच्यासाठीं जीव देईन जीव.

फणसे : हिअर हिअर. पुन्हा टाळी. (टाळी वाजवतो.)

कंटक : भोळे, बोल. किती रुपये पाहिजेत तुला ?

भोळे : पांच.

कंटक : हात्तेच्या ! त्यांत रे काय एवढं ? केव्हांला पाहिजेत ?

भोळे : निदान आज संध्याकाळपर्यंत.

कंटक : ठीक आहे.

फणसे : भोळ्या तूं माझं आपलं ऐकून ठेव नुसतं, आज संध्याकाळींच काय, पण तुला कोणत्याच काळीं ह्याच्याकडून एक कवडी मिळायची नाहीं. तो मधु असला, तरी कंटक आहे. ध्यानांत ठेव, मी आपला स्पष्ट बोलतों. तूं दुसरीकडे कुठं तरी व्यवस्था कर शहाणा असशील तर.

कंटक : भोळे, मला एकदा स्पष्ट सांग, तुझा माझ्यावर विश्वास आहे, का ह्याच्यावर ?

भोळे : तूं माझ्यावर मोठा उपकार करणार आहेस, तेव्हां तुझ्यावर माझा अगदीं पूर्ण विश्वास आहे. मग आज संध्याकाळीं अगदीं नक्की ना ? सांगूं आईला तयारी करायला ?

कंटक : अगदीं बेलाशक सांग. आज संध्याकाळीं मीं तुला पांच रुपये तुझ्या घरीं आणून दिल्याशिवाय सूर्यास्त होणं शक्य नाहीं. (जातो.)

फणसे : भोळ्या, हा कपटी शकुनी ऐन वेळीं तुला तोंडघशीं पाडल्याशिवाय राहाणार नाहीं. तुला जर ह्या संकटांतून मुक्त व्हायचं असेल, तर आतां कृष्णाचेच पाय धर बाबा.

भोळे : तुझे धरले तर तूं करशील मला साहाय्य ?

फणसे : म्हणजे अडला नारायण आहेस म्हणून धरणार वाटतं माझे पाय ? माझ्या खिशांत पांच पैसे सुद्धा नाहींत, तर पांच रुपये कुठून देऊं तुला ? मी आपला नुसता 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' पैशे विशे नाहीं बुवा. (जातो.)

भोळे : (खोलींत येरझाऱ्या घालीत स्वतःशींच पुटपुटतो.) कृष्णा भेटल्याशिवाय तर मी नाहींच जात परत. तो तर माझं काम नक्कीच करील. निदान योग्य सल्ला देऊन मार्ग दाखवील खास. पण हा कृष्णा येणार केव्हां ?

कृष्णा व्यवहारे : (आंतून प्रवेश करून) हा आलों बघ.

भोळे : आं ! अरे तूं बाहेर ना गेला होतास ? कंटक नि फणसे तुझी वाट पाहून आत्तांच गेले. नि तूं आपला घरांतच ?

कृष्णा : त्याचं असं झालं शंकर, मी बाहेर गेलों म्हणून माधवानें त्यांना दिली थाप, म्हणून मला आंत बसून राहावं लागलं ते जाईतोंपर्यंत.

भोळे : अस्सं होय ? बरं झालं मी थांबलों म्हणून. बरं, पण कृष्णा, माझं तुझ्यापाशीं थोडंसं काम आहे.

कृष्णा : ओळखलं तें मीं अंतर्ज्ञानानें. पण काय रे तू त्यासंबंधीं त्या दोघांपाशीं कांहीं बोलला नाहींस ना ?

विभाग
क्रमांक
नों.

भोळे : कां बरं ? मीं सांगायचं नव्हतं तें त्यांना ? मी तर बुवा सांगून टाकलं सगळं. नि त्याचा उपयोगही झाला.

कृष्णा : हं ? तो कसा काय ?

भोळे : वहिनी आजारी आहे म्हणून आईला मुंबईला जायला पांच सात रुपये पाहिजे होते, त्यांपैकीं पांच त्या मधु कंटकानें आज संध्याकाळीं देण्याचं वचन दिलं आहे. मला कल्पना नव्हती, इतका प्रेमळ नि चांगल्या स्वभावाचा तो असेल अशी. मनाचा मोठा दिलदार, नाहीं ?

कृष्णा : नि तो फणसे रे ?

भोळे : तो भिम्या ? तो तर आडमुठ्या रानवट आहे नुसता. उगीचच मधें मधें बडबडत होता शिष्टासारखा. बरं, त्याच्या त्या बोलण्यांत कांहीं सौजन्य, मार्दव तरी ?

कृष्णा : (विंगकडे दूरवर पाहून घाईनें) शंकऱ्या, एकदम माझ्या त्या टेबलाच्या मागें लप पाहूं....

भोळे : म्हणजे ? कां ? झालं काय ? कोण ?

कृष्णा : चकार शब्द बोलूं नकोस. आधीं चटकन् त्या टेबलाआड जाऊन बैस. अगदीं गुप्चुप् बसून राहा. (भोळेला टेबलाआड ढकलतो. टेबलक्लॉथ जरा खालीं ओढून त्याला लपवितो. नंतर खुर्चीवर बसून पुस्तक वाचीत बसतो.)

फणसे : (कंटकसह प्रवेश करून) कुठं गेला होतास रे कृष्णा ? आम्ही येऊन गेलों तुझ्याकड एकदा.

कृष्णा : हो, सांगितलं मला माधवानं. बसा की.

कंटक : काय रे, तें अजागळ भूत गेलं वाटतं ?

कृष्णा : अजागळ भूत ? म्हणजे कोण ?

कंटक : अरे तो बावळट शंकऱ्या भोळ्या. लेकाचा म्हणे, आईला मुंबईला जायचं आहे तर पांच रुपये दे. जसे कांहीं पांच रुपये

झाडाला लागले आहेत. नि त्या भिकारड्याला पांच पैसे तरी कुणी देईल का रे ?

कृष्णा : मग तूं काय सांगितलंस त्याला ?

कंटक : मीं म्हटलं, "हो हो, त्यांत रे काय एवढं मोठं ? आज संध्याकाळीं मी तुला तुझ्या घरीं पांच रुपये आणून दिल्याशिवाय सूर्यास्त होणं शक्य नाहीं."

फणसे : असा महागाढव आहे हा, उगीचच त्या बिचाऱ्याला वेडी आशा लावून ठेवली.

कंटक : तुला माहीत नाहीं. अरे, असल्या महामूर्खांना असंच बनवलं पाहिजे.

फणसे : पण तें कां ? तो का तुझ्या पाठीस लागला होता ? नि उद्यां तो पुन्हा भेटला म्हणजे ?

कंटक : दुसरी एक लोणकढी द्यायची ठेवून. त्या ठोंब्याला बनवायला रे काय अक्कल लागते ?

फणसे : काय दुष्टपणा हा. नि त्यापासून फायदा काय ?

कंटक : गंमत ! दुसरं काय ? नि गोड गोड बोलून त्याच्यावर छाप कशी बसवली ?

कृष्णा : पण हें सगळं त्याच्या कानांवर गेलं तर ?

कंटक : कसं जाणार ? तूं तर कांहीं नाहीं सांगणार ?

फणसे : पण मी सांगेन.

कंटक : तुझ्यावर त्याचा विश्वास बसेल तर ना ?

फणसे : असला भोळा खुळा विश्वास असण्यापेक्षां पूर्ण अविश्वास असला तरी कांहीं वाईट नाहीं. पण तें राहूं दे. कृष्णा, माझं एक काम कर तूं. ही पांच रुपयांची नोट घे नि त्या भोळेला नेऊन दे. हे माझे स्कॉलर्शिपचे पैसे; आईपाशीं ठेवायला दिले होते. ते आणले तिच्यापासून मागून.

कृष्णा : तुझ्या स्कॉलर्शिपचे पैसे ? मग तुझे तूंच देईनास त्याला ते.

फणसे : छे, छे. तूंच दे नि माझं नांव सुद्धा सांगूं नकोस त्याला. त्याचं काम भागलं म्हणजे झालं.

कंटक : भिम्या, शुद्धीवर आहेस ना चांगला ? नि हे पांच रुपये तुला कोणत्या जन्मीं परत मिळायचे ?

फणसे : तूं गप्प राहा रे. कृष्णा, त्याची घरची परिस्थिति मला माहीत आहे. कुठून देईल बिचारा पांच रुपये ? मला त्यांची आशाही नाहीं नि माझं नांवही त्याला कळायला नको.

(भोळे एकदम बाहेर येऊन त्याचे पाय धरतो.)

भोळे : कां बरं तुझं नांव मला कळूं नये, फणसे ? माझ्या उपकार-कर्त्याशीं मी कसा बरं कृतघ्न राहीन ? तूं खरोखर फार उदार मनाचा आहेस. मला क्षमा कर. मीं तुझी ह्या कृष्णापाशीं निंदा केली. मला क्षमा कर.

फणसे : (त्याला उठवून) ऊठ, ऊठ, भोळे, हें काय वेड्यासारखं ? क्षमा कसली करायची आहे त्यांत. अरे तुझी चूक नाहीं मुळींच. माझं एकंदर बोलणं नि वागणं आहेच तसं आडदांडपणाचं. कृष्णा, बेट्या ही सारी तुझी कारवाई.

कृष्णा : माझी ? भले. मीं रे बाबा काय केलं ? अरे, त्याचं नशीब चांगलं आहे. हे तुझे पांच आहेतच त्याचे नि संध्याकाळीं कंटकनें त्याला त्याचे पांच दिल्याशिवाय सूर्यास्त होणं शक्यच नाहीं.

कंटक : भोळे, खरा गुन्हेगार मी आहें. मीच तुझी माफी मागतों. मला क्षमा कर. ह्या फणसेनें खरोखर मला लाजवलं आहे आज. चांगलंच अंजन घातलं माझ्या डोळ्यांत.

कृष्णा : पण त्या डोळ्यांना चकवून सूर्य अस्तास जायचा, बरं का एकदम.

कंटक : काय बिशाद आहे त्याची ? (खिशांतून पैशांचें पाकीट काढून)

भोळे : मला क्षमा कर.

[पृष्ठ ८०

दादा : अहो, ह्या सरोजिनीदेवी नायडू. [पृष्ठ ८८

शंकरा, हें पांच पाकळ्यांच स्नेहपुष्प मी तुला मोठ्या प्रेमानें अर्पण करतों. (त्याला पांच रुपये देतो.)

भोळे : कृष्णा, ती फणसेची नोट दे त्याची त्याला परत. आईला नेऊन देईल तो.

कृष्णा : अरे, पण घाई कां इतकी ? ते रुपये वाजवून घे आधीं. हो, एखादे वेळीं चुकून पांचांचे ऐवजीं सहा यायचे.

कंटक : मला सन्मार्गाला लावणाऱ्या हे त्रिमूर्ती गुरुदेवदत्ता, मी तुम्हांला साष्टांग प्रणिपात करतों. (तसें करतो.)

फणसे : बा भक्तश्रेष्ठा ! आम्ही तुझ्यावर प्रसन्न झालों आहोंत; वर माग.

कृष्णा : वधू माग रे मधू—.

पडदा पडतो.

बाळ गोपाळ

बाळ : गोपाळ, गोपाळ, ए गोप्या, इकड ये पाहूं जरा.

गोपाळ : (प्रवेश करून) काय रे बाळ ?

बाळ : गोप्या, मी एक नवीन गमतीचा खेळ शोधून काढला आहे ; खेळशील ?

गोपाळ : हो, खेळीन कीं. कोणता रे नवा खेळ ?

बाळ : हें बघ, मी बाळ ना ? म्हणजे मी समजायचा लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

गोपाळ : नि मी ?

बाळ : तुझं नांव गोपाळ ना ? म्हणून तूं व्हायचंस नामदार गोपाळ कृष्ण गोखले, समजलं ? आतां असं समजायचं कीं तूं माझ्याकडे, म्हणजे गोखले टिळकांकडे आले आहेत. आलं ध्यानांत ? आतां बोलायला सुरुवात करतों हं.

गोपाळ : अरे पण आपण पाठ कुठं काय केलं आहे ? बोलायचं काय आपण ?

बाळ : अरे, तसंच बोलायचं एकदम सुचेल तें. चांगला नामदार गोखल्यांसारखा बोल हं.

दादा : (प्रवेश करून) आणि मी रे ? मला घ्या कीं तुमच्या खेळांत.

बाळ : तूं नकोस. आमचा दोघांचाच आहे हा खेळ. तूं नुसता वाटलं तर तिथं उगीच बसून पाहा आमचा खेळ.

दादा : नाहीं घेतलंस तर नाहीं जा. मी आपलं तुमच्यावर मधूनमधून टीका करण्याचं सोपंसं काम करीन.

बाळ : हं, गोप्या, सुरुवात करतों हं मी. चांगला ऐटींत बैस नि चष्मा लावल्यासारखं पाहा हं. अहो गोपाळराव, ह्या सरकारनें मला कितीही वेळां तुरुंगांत टाकलं, तरी मी डरणार नाहीं. तिथं बसून गीतारहस्यासारखे मोठमोठाले सुंदर ग्रंथ लिहीन आणि बाहेर पडलों, कीं पुन्हा जोरजोरानें व्याख्यानं देऊन माझ्या केसरींत सारखे जहाल लेख लिहीत राहीन.

गोपाळ : आणि बळवंतराव, मीही कौन्सिलांत अशींच भाषणं करीत राहीन तुरुंगांत न जातां. खरं सांगूं तुम्हांला? मला रात्रंदिवस सारखी काळजी लागली आहे, कीं आपल्याला होमरूल कधीं मिळणार?

दादा : होमवर्कची अशी काळजी लागली, तर वर्गांत छड्या तरी मिळणार नाहींत खास.

गोपाळ : मधें कां रे बोलतोस दाद्या?

दादा : नामदार गोखले आपल्या वडील भावाला दाद्या म्हणत होते वाटतं?

बाळ : गोप्या, असं चिडायचं नाहीं. तो नाहीं असं समजून आपलं बोलणं चालू ठेवायचं. बरं का? हं, अहो गोपाळराव, त्यांत एवढी काळजी कसली करायची? अहो मिळवायचंच तसं. बरं का गोपाळराव, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे नि तो मी मिळवणारच बुवा.

दादा : बाबा ऑफिसांत गेल्याबरोबर. नि ते संध्याकाळीं परत आल्यावर सी-एच्-ओ-ए-पी-चा जन्मसिद्ध हक्क आहेच.

गोपाळ : पण म्हटलं बळवंतराव, आमच्या कार्याला आम्हांला तुमचं साहाय्य मिळालं पाहिजे, बरं का? अहो, आपण दोघांनीं मिळून सारखी चळवळ करीत राहिलं पाहिजे.

दादा : गणिताच्या तासाला चाललेली असते, तशी वाटतं?

बाळ : वा! गोपाळराव, साहाय्य केलं पाहिजे काय म्हणतां?

गोपाळ : अहो, तुम्ही पुण्यांतले सिंह आहांत सिंह....

दादा : आणि तुम्ही सर्कशींतले वाटतं ?

गोपाळ : नि आपण दोघं त्या फर्ग्युसन् कॉलेजांत होतों, तेव्हां त्या टेकडीवर बसून शपथा नाहीं का घेतल्या ?

दादा : प्रिन्सिपॉल महाजनींच्या समोर ?

बाळ : तर हो. मी विसरलों नाहीं कांहीं. पण काय हो गोपाळराव ? म्हटलं, यंदा तुम्हीं काँग्रेसचे अध्यक्ष होता का ? सुचवूं का नांव तुमचं ?

दादा : तें नाहीं जमलं, तर निदान 'फर्स्ट ए' चे सेक्रेटरीच व्हा.

गोपाळ : काय म्हणतां, काँग्रेसचा अध्यक्ष ? पण आधीं एकदा सावरकरांचं मत घेतलं पाहिजे हो.

दादा : नाहीं तर जवाहरलाल नेहरूंचं घ्या.

गोपाळ : खरं सांगूं तुम्हांला बळवंतराव ? मला किनई मुळीं वेळच नाहीं हो काँग्रेसचा अध्यक्ष व्हायला. माझ्या त्या अंकगणितांतलीं अजून शें दोनशें गणितांचीं उत्तरं तयार करायचीं आहेत मला.

दादा : त्यांत काय एवढं मोठं ? शेंडेला तीं करायला सांगून, त्यांचीं उत्तरं कॉपी करून पटापट ठोका, म्हणजे झालं.

गोपाळ : आणि बरं का बळवंतराव, काल म्हटलं, जरासा स्वार्थत्याग करून आपल्या मातृभूमीची सेवा करावी, तर इतक्यांत एम्. ए. चं एक कठीण उदाहरण विचारायला आले एक गणिताचे प्रोफेसर....

दादा : तेव्हां हे म्हणाले, "उत्तरावरून उलटे या रीत काढीत, म्हणजे समजेल तें."

बाळ : माझंही अगदीं असंच होतं बघा. परवां मी माझ्या केसरीकरितां एक असाच ज्वलज्जहाल लेख लिहीत होतों, तों तेवढ्यांत एक शास्त्री माझ्या गीतारहस्यांतली एक शंका विचारायला आले.

दादा : शंका विचारायला चांगलाच शंख पाहून काढला म्हणायचा.

गोपाळ : काय हो बळवंतराव, तुमच्या केळकरांनीं तुमचं म्हणे एक चरित्र लिहलं आहे. हो ?

दादा : असं बाबा म्हणत होते.

गोपाळ : असं आमचे बाबा – नाहीं – वाचलं आहे कीं मी तें सगळं. किती चांगलं आहे हो?

बाळ : आवडलं तुम्हांला? पण काय हो गोपाळराव, तुमची ती आंबराईच्या तिकडची सोसायटी कशी काय चालली आहे हो?

दादा : वर्षाकांठीं पन्नास साठ हजारांचा फायदा होतो की त्या कोऑपरेटिव्ह सोसायटीला.

गोपाळ : कोणती बुवा सोसायटी म्हणतां? हं हं, ती होय? फार चांगली चालली आहे कीं. आमचे गोपाळराव देवधर तिचे अध्यक्ष होते, तेव्हां तर चांगलीच भरभराट होत होती तिची.

बाळ : त्यांच्या निधनामुळं फार नुकसान झालं नाहीं आपल्या सोसायटीचं? आतां कोण आहे हो अध्यक्ष?

दादा : बाबांना विचारलं पाहिजे हो.

गोपाळ : पण काय हो लोकमान्य, मला दुसरी एक अशी सारखी काळजी वाटते, कीं आपल्या देशांतला हा हिंदुमुसलमानांचा प्रश्न कसा सुटणार!

दादा : जाऊं द्या हो सुटत नसेल तर. पेपरमधलाच एखादा सुटला तर बघा तूर्त.

गोपाळ : अत्यंत महत्त्वाचा आहे तो प्रश्न ह्यांत संशय नाहीं. कसं तरी करून सोडवलाच पाहिजे.

बाळ : त्याचं असं करू गोपाळराव, आपण पुण्यांत एक अखिल भारतीय हिंदुमुसलमानांची संयुक्त परिषद भरवूं या.

दादा : आणि जिनांच्या मुस्लिम लीगशीं कांहीं सन्माननीय तडजोड झाली तर पाहूं या.

बाळ : हो बरी आठवण झाली. काय हो गोपाळराव, जिनांच्या ह्या पाकिस्तानच्या कल्पनेबद्दल तुम्हांला काय वाटतं हो?

गोपाळ : त्याच्याबद्दल माझं असं मत आहे, कीं – अजून विचार चालला आहे त्यासंबंधीं माझा. एकदम कसं मत ठोकतां येईल,

बळवंतराव? आपण पडलों पुढारी. लागलीच हिंदुस्थानांतल्या सर्व वर्तमानपत्रांत छापून यायचं फोटो सुद्धा.

बाळ : तेंही खरंच. पण त्यांतील मूलभूत तत्त्व?

गोपाळ : तेंच ना, त्यांतील तत्त्व आणि तपशील ह्यासंबंधीं तर मुळीं माझा मतभेद आहे. खरं म्हटलं, तर त्याची कल्पनाच इतकी कांहीं विचित्र आहे, कीं अजूनपर्यंत ती माझ्या नीटशी ध्यानांत येत नाहीं.

बाळ : असं होय? बरं, पण माझ्या हिंदुमुसलमानांच्या संयुक्त परिषदेबद्दल तुमचं काय मत आहे?

गोपाळ : उत्तम कल्पना आहे. जरूर भरवूं या की परिषद. तुम्ही असं करा, कीं अध्यक्षपदासाठीं माझं नांव सुचवा. बरं, पण ही परिषद भरायची कुठं?

दादा : अहो आपल्या गोखले हॉलमध्यें.

गोपाळ : कांहीं वाईट नाहीं कल्पना. मी झकासपैकीं भाषण करून सगळ्यांना पटवून देतों, कीं हिंदुमुसलमानांची एकी झाली रे झाली, कीं दुसऱ्या दिवशीं हे सर्व इंग्रज आपल्या देशांतून पळून जातील.

दादा : बाबांच्या काठीची आणि ह्यांच्या पाठीची एकी झाल्यावर हे जसे पळून जातात तसे.

बाळ : अगदीं बरोबर आहे. माझं तत्त्व असं आहे गोपाळराव, कीं फळाची आशा न धरतां आपण सारखं कर्म करीत राहिलं पाहिजे.

दादा : कारण फळाची आशा धरली, म्हणजे आंब्याच्या झाडावर दगड मारण्याची बुद्धि होते आणि मग रखवालदाराकडून बंधन प्राप्त होऊन कर्माचं फळ भोगावं लागतं.

बाळ : भगवंतांनीं गीतेंत अगदीं स्पष्ट म्हटलं आहे, कीं 'बाबारे, कर्मण्येवाधिकारस्ते।'

गोपाळ : म्हणजे अनेक रस्ते आहेत, मार्ग आहेत आपलं स्वराज्याचं ध्येय गांठायला, नाहीं का?

दादा : पण बोळाबोळानं गेलं तर लवकर पोहोचूं कीं.

बाळ : माझ्या राजकारणांतली माझी अशी स्पष्ट पॉलिसी आहे गोपाळराव, कीं आईनें हातावर गुळाचा लहानसा खडा ठेवला, कीं तो एकदम तोंडांत टाकायचा नि पुन्हा आपला हात पुढें करायचा दुसऱ्याकरितां.

दादा : कीं पाठींत बसलाच धपाटा.

बाळ : बसूं दे जा. अहो गोपाळराव, तुमचं म्हणे मागच्या महिन्यांत कौन्सिलांत फार जोरदार भाषण झालं हो ? आमच्या केसरींत आणि टाइम्समध्यें आलं होतं.

दादा : नि गोपाळरावांच्या लोकशक्तींतही आलं होतं कीं....

गोपाळ : कोणतं हो म्हणतां भाषण ? अहो, सारखीं भाषणं नि व्याख्यानं होत असतात. त्यामुळें लक्षांत राहात नाहीं. हं हं हं, तें होय ? मीं सांगितलं सरकारला ठासून, कीं तुम्ही लष्कराकरतां उगीच इतके पैसे खर्च करतां, म्हणून आमच्या शिक्षणाकरतां कांहींच उरत नाहीं.

दादा : त्यामुळें शिक्षण कोण महाग झालं आहे ? शाळांच्या फिया वाढल्या नि होमवर्कची वही तर आठ दिवसाला नवी घ्यावी लागते.

बाळ : अहो, आपल्या शिक्षणाकरितां पैसे द्यायचे त्यांच्या मनांत नाहीं, दुसरं काय ?

गोपाळ : तर काय हो ! अहो, मनांत आल्यावर सरकारला पैशाला हो काय कमी ?

दादा : सगळ्या टांकसाळी नि नोटांचे छापखाने त्यांचेच कीं.

गोपाळ : बळवंतराव, सुपारी बिपारी असली तर काढा कीं जरा. मघापासून वाट पाहातों आहें मी.

बाळ : वा जरूर. विसरलोंच बघा अगदीं बोलण्याच्या नादांत. आमच्याकडे हो काय सुपारीची कमतरता ?

दादा : वाण्याकडची संपली म्हणजे तो ह्यांच्याचकडून घेऊन जातो.

१००४२ ७५५५ २८५

बाळ : थांबा, चांगली भाजकी देतो हं आंतून आणवून. श्रीधर, ए श्रीधर, अरे रामभाऊ.

दादा : दोघंही 'अर्धांगी' पाहायला गेले आहेत.

बाळ : असं होय ? मग हीच घ्या झालं माझ्या चंर्चींतली. आणि ह्या राजकारणांतला दुसरा मुद्दा असा, बरं का गोपाळराव, कीं जोंपर्यंत हें सरकार....

सरोज : (प्रवेश करून) ए दादा, बाळ, गोपाळ, आईनें तिखटा मिठाचे पोहे केले आहेत. तुम्हांला....

बाळ : मध्यें बोलूं नकोस ग सरू. जा घरांत. आम्हांला नको कांहीं.

गोपाळ : ह्या हो कोण, बळवंतराव ?

दादा : ह्या होय. अहो, ह्या सरोजिनीदेवी नायडू.

सरोज : इश्श ! चावट कुठला ! तुम्हांला यायचं आहे कीं नाहीं (आंतून आईचा आवाज 'या रे बाळांनो आंत')

गोपाळ : चला लोकमान्य, पोहे खायला.

बाळ : चला नामदार.

दादा : थांबा. हा दादाभाई नवरोजीही येतो आहे अ तुमच्याबरोबर.

(सर्व जातात.)

वाचनालय ...
अनुक्रम १५०६२
विभाग ...
क्रमांक ...
नों. दि. ९/८/८५

हसरी संवादसृष्टि

कांहीं मुलांना गोष्टींपेक्षां सुद्धा चिमुकल्या नाटिका नि चुरचुरीत संवाद जास्त आवडतात. आणि संमेलनप्रसंगीं तर अशा पुस्तकांवर सर्वांच्याच उड्या पडतात. पुढें दिलेलीं पुस्तकें अशा मुलांसाठीं मुद्दाम निवडलेलीं आहेत–

संगीत संवाद

वि. ज. कामत

बालवीर, शिक्षण, ग्रामोद्धार, चहाचें स्तोम, अस्पृश्यतानिमूर्लन... नांवांवरूनच संवादांचें स्वरूप लक्षांत येतें ! शालेय समारंभांना फारच उपयोगी. बारा आणे

गीतें आणि संवाद

रामभाऊ भोगे

'लोकयुद्ध हें फोल' 'अष्टी आणि चिमूर' सारखी ज्वलन्त इतिहासाचें स्मरण देणारीं गाणीं व 'सुशिक्षित बेकार' 'निवडणुकीचा शिमगा' इ० मौजेचे बोधप्रद संवाद. बारा आणे

बालवीर

के. गो. पंडित

ह्या नाटुकल्यांतले बालवीर म्हणजे नुसते इस्त्रीच्या कपड्यांतले फाकडे पोशाखी लोक नाहींत. तर खरेखुरे बंधुभावानें निगडित असे निस्वार्थी कुमार आहेत. चार आणे

सिंहगड

ग. पां. परचुरे

'जिजामाउलीच्या इच्छेपुढें रायाचं लगीन भारी न्हाई' म्हणून कोंडाण्यावर स्वारी करून 'सिंह' पद मिळवणाऱ्या तानाजीची ही नाट्यमय कथा कोणाला आवडणार नाहीं ? आठ आणे

विरामचिन्हांची मेजवानी

वा. गो. नाईक

प्रमिलाबाई प्रश्नचिन्हें, अनसूयाबाई अनुस्वार, उषा उद्गारचिन्हें... अशीं नांवें आपण नाटकांत तरी घ्यावीं असें तुम्हांला वाटतें कीं नाहीं ? चार आणे

नाट्यछटा व संवाद

के. गो. पंडित

'नवें शिक्षण', 'सेंचरी स्ट्रस्मन,' हे तरी काय पांच ऐतिहा- पांच आणे

IRBK-0112975

IRBK-0112975

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४